दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | गुरुवार, दि. ११ जून, २०२६ | वर्ष - १ | अंक - २५६ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


### आजचे पंचांग

गुरुवार, दि. ११ जून २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२८, शालिवाहन शक १९४८, विक्रम संवत २०८२, पराभवनाम संवत्सर, उत्तरायण, ग्रीष्म ऋतु, अधिक ज्येष्ठ मास, कृष्णपक्ष, एकादशी रात्री १०-३७ पर्यंत नंतर द्वादशी तिथी, दिवस नक्षत्र– रेवती सकाळी ८-१७ पर्यंत नंतर अश्विनी, चंद्र रास - सकाळी ८-१७ पर्यंत मीन नंतर मेष, सूर्य रास - वृषभ, गुरु रास - कर्क

### उन्हाचा चटका कायम

**पुणे** : पुणेशहरासह जिल्ह्यात आठवड्यापासून कमाल तापमान ३८ अंशावर स्थिर असल्याने उन्हाचा चटका आणि उकाड्याने नागरिक हैराण झाले. गेल्या २४ तासात शहरातील कमाल तापमानात एक ते दोन अंशाने घट झाल्याने दुपारच्या चटक्यापासून दिलासा मिळाला, मात्र उकाडा कायम आहे. मंगळवारी शिवाजीनगर येथे सर्वाधिक ३५.२ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. उकाड्याने हैराण झालेले पुणेकर मान्सूनची आतुरतेने वाट पाहत आहे.

## सारांश वृत्त

### किनारपट्टीवर मासेमारीस बंदीचा इशारा

**तिरुवनंतपुरम** : भारतीय हवामान विभागाने केरळ, कर्नाटक आणि लक्षद्वीप किनारपट्टीवरील मच्छीमारांना काही दिवस समुद्रात न जाण्याचा इशारा दिला आहे. ११ ते १२ जूनदरम्यान या भागात ताशी ४० ते ६० किलोमीटर वेगाने जोरदार वारे वाहण्याची आणि समुद्र खवळलेला राहण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. तसेच १० ते १४ जूनदरम्यान केरळमधील काही भागांत मुसळधार पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे.

### शिमल्यात शॉर्टसर्किटमुळे आग

**शिमला :** शिमला जिल्ह्यातील शिरगुली गावात भीषण आगीत दोन घरे जळून खाक झाली. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. प्राथमिक माहितीनुसार, दुपारी साडेदोनच्या सुमारास वीज मीटरमध्ये ठिणगी पडल्याने लयाक राम बकसेठ यांच्या घराला आग लागली. लाकडी बांधकाम असल्याने आग वेगाने पसरून शेजारच्या घरालाही विळखा घातला. आगीदरम्यान स्फोटांचे आवाजही ऐकू आले. गावकऱ्यांनी आग विझविण्याचे प्रयत्न केले; मात्र ती नियंत्रणाबाहेर गेली. प्रशासनाने घटनेची चौकशी सुरू केली आहे.

### एसएचओसह नऊ पोलिस निलंबित

**जयपूर :** जयपूरमधील बेकायदा फटाक्यांच्या कारखान्याला लागलेल्या भीषण आगीत आठ जणांचा मृत्यू झाल्याप्रकरणी स्टेशन हाऊस ऑफिसर यांच्यासह नऊ पोलिस कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे. जयपूरचे पोलिस आयुक्त सचिन मित्तल यांनी ही माहिती दिली. सार्वजनिक सुरक्षेसंदर्भातील गंभीर त्रुटी आणि निष्काळजीपणा उघड झाल्याने ही कारवाई करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

### भाजपविरोधी मतांचे विभाजन टाळण्यासाठी निर्णय

# सोनियांची ममतांना विलिनीकरणाची ऑफर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : पश्चिम बंगालमधील बदलत्या राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांनी तृणमूल काँग्रेसच्या अध्यक्षा ममता बॅनर्जी यांना पक्ष काँग्रेसमध्ये विलीन करण्याचा प्रस्ताव दिल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, भाजपविरोधी मतांचे विभाजन टाळण्यासाठी आणि विरोधकांची ताकद वाढविण्यासाठी काँग्रेसकडून हा प्रस्ताव पुढे करण्यात आला आहे.



तृणमूल काँग्रेसमध्ये वाढत्या अंतर्गत नाराजीमुळे पक्षासमोर मोठे आव्हान निर्माण झाले आहे. अनेक आमदार आणि खासदार बंडखोरीच्या तयारीत असल्याच्या चर्चांमुळे ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वावरील दबाव वाढला आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेसने ममता बॅनर्जी यांना राष्ट्रीय उपाध्यक्षपद, तर त्यांचे पुतणे अभिषेक बॅनर्जी यांना महासचिवपद देण्याची तयारी दर्शवल्याचे वृत्त आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, या प्रस्तावावर निर्णय घेण्यासाठी ममता बॅनर्जी यांनी काही दिवसांचा अवधी मागितला आहे. दरम्यान, तृणमूल काँग्रेसच्या २८ खासदारांपैकी सुमारे २० खासदार बंडखोरीच्या भूमिकेत असल्याचे सांगितले जात आहे. काकोली घोष यांच्या नेतृत्वाखालील या गटाने स्वतंत्र संसदीय गट स्थापन करण्यासाठी हालचाली सुरू केल्या असून लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्याकडे स्वतंत्र आसनव्यवस्थेची मागणी केल्याचेही वृत्त आहे. बंगालमधील राजकीय परिस्थिती दिवसेंदिवस गुंतागुंतीची होत असताना काँग्रेस आणि तृणमूल काँग्रेस यांच्यातील संभाव्य राजकीय समीकरणांकडे राष्ट्रीय राजकारणाचे लक्ष लागले आहे. मात्र, या कथित प्रस्तावाबाबत काँग्रेस किंवा तृणमूल काँग्रेसकडून अद्याप अधिकृत प्रतिक्रिया देण्यात आलेली नाही.

(संबंधित वृत्त पान ४ वर)

# उरी सेक्टरमध्ये स्फोट; दोन जवान शहीद

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**श्रीनगर** : जम्मू-काश्मीरमधील बारामुल्ला जिल्ह्यातील उरी सेक्टरमध्ये नियंत्रण रेषेजवळ झालेल्या स्फोटात भारतीय लष्कराचे दोन जवान शहीद झाले. कमलकोट परिसरातील लष्करी छावणीत हा अपघाती स्फोट झाल्याची प्राथमिक माहिती असून लष्कराने या घटनेच्या चौकशीचे आदेश दिले आहेत.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, मंगळवारी सायंकाळी नियंत्रण रेषेजवळील उरी सेक्टरमधील कमलकोट भागात हा स्फोट झाला. स्फोट इतका भीषण होता की त्यात दोन जवान गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने श्रीनगरमधील बदामीबाग लष्करी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचारादरम्यान दोघांचीही प्राणज्योत मालवली.

शहीद जवानांची ओळख चव्हाण विक्रम बाळकृष्ण (रा. ऐरोली, महाराष्ट्र) आणि अर्जुन जाधव राजेंद्र (रा. शाहपूर, महाराष्ट्र) अशी झाली आहे. दोन्ही जवान महाराष्ट्रातील असल्याने राज्यभरातून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. घटना घडल्यानंतर लष्कर आणि सुरक्षा यंत्रणांनी तातडीने परिसराची नाकेबंदी करून तपास सुरू केला. स्फोटाचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसून तो कोणत्या कारणामुळे झाला, याचा शोध घेतला जात आहे.

लष्कराने या दुर्घटनेची सखोल चौकशी करण्याचे आदेश दिले असून वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी दाखल झाले आहेत. देशाच्या संरक्षणासाठी कर्तव्य बजावताना दोन जवानांना वीरमरण आल्याने सैन्यदलात आणि त्यांच्या मूळ गावी शोककळा पसरली आहे.

# सीईटी विद्यार्थ्यांसाठी ४० सहाय्यता केंद्रे सुरू

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**मुंबई** : सीईटी परीक्षा, केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया (सीएपी), शिष्यवृत्ती योजना आणि विविध प्रवेश प्रक्रियांबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व तांत्रिक सहाय्य मिळावे यासाठी राज्यभरात सीईटी विद्यार्थी सहाय्यता केंद्रे सुरू करण्यात आली आहेत. या केंद्रांच्या सेवेला बुधवारपासून प्रारंभ झाला असून राज्यातील ३६ जिल्ह्यांमध्ये एकूण ४० केंद्रे उभारण्यात आली आहेत.

उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झालेल्या बैठकीत या उपक्रमाचा आढावा घेण्यात आला. विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेतील प्रत्येक टप्प्यावर अचूक आणि विश्वासार्ह माहिती उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा उद्देश असल्याचे पाटील यांनी सांगितले.

ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना अर्ज भरणे, कागदपत्रे अपलोड करणे, तांत्रिक अडचणी सोडवणे आणि प्रवेशासंदर्भातील शंकांचे निरसन स्थानिक पातळीवरच करता यावे, यासाठी ही केंद्रे उपयुक्त ठरणार आहेत. राज्यातील ४० केंद्रांपैकी मुंबईत तीन, पुण्यात दोन आणि नागपुरात दोन केंद्रे असणार आहेत. सध्या २६ केंद्रे कार्यान्वित झाली असून उर्वरित केंद्रे लवकरच सुरू करण्यात येणार आहेत.

### धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची पुन्हा मागणी

# सीजेपीचे नीट प्रकरणी आज पुण्यात आंदोलन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : नीट पेपरफुटी प्रकरणावरून केंद्र सरकारविरोधातील आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजित दीपके यांनी दिला आहे. पुण्यात आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा न दिल्यास देशव्यापी आंदोलन छेडण्यात येईल, अशी घोषणा केली.

दीपके यांनी सांगितले की, ६ जून रोजी दिल्लीतील जंतर-मंतर येथे नीट पेपरफुटीविरोधात मोठे आंदोलन करण्यात आले होते. या आंदोलनाला विद्यार्थी आणि पालकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. आता या आंदोलनाची पुढील फेरी पुण्यातून सुरू होणार असून त्यानंतर लखनौ, बेंगळुरू आणि इतर शहरांमध्येही आंदोलने केली जाणार आहेत. धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा न दिल्यास २० जून रोजी पुन्हा दिल्लीतील जंतर-मंतर येथे मोठे आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात आंदोलनासाठी परवानगी मिळाल्याची माहितीही त्यांनी यावेळी दिली.



अमेरिकेतून भारतात परतलेल्या अभिजित दीपके यांनी विद्यार्थी आणि पालकांना निर्भयपणे आपले मत मांडण्याचे आवाहन केले. विद्यार्थ्यांच्या आवाजाला दाबण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप करत त्यांनी पालकांनी आपल्या मुलांना प्रश्न विचारण्यापासून आणि अन्यायाविरोधात बोलण्यापासून रोखू नये, असे म्हटले. यावेळी त्यांनी आपल्या कुटुंबीयांच्या चिंतेचाही उल्लेख केला. भारतात परतल्यानंतर आपल्याला अटक होण्याची किंवा हल्ला होण्याची भीती आई व्यक्त करत असल्याचे सांगत, देशातील विद्यार्थ्यांच्या प्रश्नांसाठी आवाज उठविणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

देशभरातील लाखो विद्यार्थी एकत्र आले तर कोणाचाही आवाज दाबण्याची हिंमत कुणी करणार नाही, असा विश्वास व्यक्त करत त्यांनी विद्यार्थ्यांना आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन केले. अमेरिकेत परत जाणार का, या प्रश्नावर आता कायम भारतातच राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. उद्याच्या आंदोलनाला हजारो विद्यार्थी उपस्थित राहतील आणि दिल्लीतील जंतर-मंतर आंदोलनापेक्षाही मोठा प्रतिसाद मिळू शकतो, असा विश्वासही दीपके यांनी व्यक्त केला.

### उपमुख्यमंत्री शिंदेंचे हत्येच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल करण्याचे आदेश

# धक्कादायक! ठाण्यात ज्येष्ठ नागरिकाला मारहाण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**ठाणे** : ज्युपिटर रुग्णालय परिसरात एका ज्येष्ठ नागरिकाला झालेल्या अमानुष मारहाणीच्या घटनेने ठाणे शहरात संतापाची लाट उसळली आहे. रस्त्यावर थुंकण्यास विरोध केल्याच्या कारणावरून एका ओला कॅब चालकाने वृद्ध व्यक्तीला बेदम मारहाण करून गंभीर जखमी केल्याचा प्रकार समोर आला आहे. या घटनेची गंभीर दखल घेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आरोपीविरुद्ध हत्येच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले आहेत.



मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी सायंकाळी एक ज्येष्ठ नागरिक आपल्या पत्नीसह ज्युपिटर रुग्णालयासमोरील पदपथावरून जात होते. त्यावेळी ओला कॅब चालक निशांत धर शुक्ला (वय ४०) याने रस्त्यावर थुंकल्याचे त्यांनी पाहिले. याबाबत त्याला जाब विचारत सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता करू नये, अशी समज दिली.

या कारणावरून संतापलेल्या चालकाने गाडीतून उतरून वृद्ध व्यक्तीशी वाद घालण्यास सुरुवात केली. काही वेळातच वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. आरोपीने ज्येष्ठ नागरिकाला जमिनीवर पाडून बेदम मारहाण केली. या मारहाणीत त्यांचा पाय फ्रॅक्चर झाला असून त्यांना गंभीर दुखापत झाली आहे. तसेच आरोपीने दगड उचलून हल्ला करण्याचाही प्रयत्न केल्याची माहिती समोर आली आहे.

घटनेची माहिती मिळताच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांच्याशी थेट संपर्क साधला. अशा प्रकारची दादागिरी आणि कायद्याचा अवमान खपवून घेतला जाणार नाही, असे स्पष्ट करत त्यांनी आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०७ अंतर्गत हत्येच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल करण्याचे निर्देश दिले.

सध्या वर्तकनगर पोलीस ठाण्यात या प्रकरणाचा तपास सुरू असून आरोपीविरुद्ध कठोर कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या घटनेमुळे ठाणेकरांमध्ये संताप व्यक्त होत असून सार्वजनिक ठिकाणी नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

### तामिळनाडूत दारू विक्रीसाठी २१ वर्षांची वयोमर्यादा

**चेन्नई :** तामिळनाडू सरकारने दारू विक्रीसाठी २१ वर्षांची किमान वयोमर्यादा काटेकोरपणे लागू करण्याचे आदेश दिले आहेत. २१ वर्षांखालील कोणत्याही व्यक्तीला मद्य विक्री करता येणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे. ग्राहकाच्या वयाबाबत शंका असल्यास विक्रीपूर्वी अधिकृत ओळखपत्र किंवा वयाचा पुरावा तपासणे विक्रेत्यांसाठी बंधनकारक करण्यात आले आहे. मुख्यमंत्री सी. जोसेफ विजय यांच्या नेतृत्वाखाली राज्यात अमली पदार्थमुक्त, निरोगी आणि सामाजिकदृष्ट्या जबाबदार वातावरण निर्माण करण्यासाठी सरकार कटिबद्ध असल्याचे निषेध व उत्पादन शुल्क आयुक्तांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे सांगितले आहे.

# विदर्भातील शाळा ३० जूनपासून सुरू

### उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचा महत्त्वपूर्ण निर्णय

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नागपूर** : विदर्भातील विद्यार्थ्यांना उन्हाच्या तीव्रतेपासून दिलासा देत मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने विदर्भातील शाळा ३० जूनपासून सुरू करण्याचे निर्देश दिले आहेत. राज्य सरकारने १५ जूनपासून शाळा सुरू करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, विदर्भातील तीव्र उष्णतेच्या पार्श्वभूमीवर या निर्णयाला आव्हान देणारी जनहित याचिका दाखल करण्यात आली होती.

याचिकाकर्त्यांनी न्यायालयात मांडले की, जून महिन्यात विदर्भातील तापमान अनेकदा ४२ ते ४४ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचते. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांना, विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यास गंभीर अडचणी निर्माण होतात. अनेक विद्यार्थ्यांना लांब अंतर पायी प्रवास करावा लागतो, त्यामुळे त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे. सुनावणीदरम्यान २००७ मधील न्यायालयीन आदेशाचाही उल्लेख करण्यात आला. त्या आदेशानुसार विदर्भातील शाळा ३० जूननंतरच सुरू करण्याची भूमिका न्यायालयाने घेतली होती. याशिवाय राज्य शासनाने २०२२ आणि २०२३ मध्येही विदर्भासाठी स्वतंत्र शैक्षणिक वेळापत्रक स्वीकारले होते, असे याचिकाकर्त्यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. या पार्श्वभूमीवर नागपूर खंडपीठाने विद्यार्थ्यांच्या आरोग्य आणि सुरक्षेला प्राधान्य देत विदर्भातील शाळा ३० जूनपासून सुरू करण्याचा निर्णय कायम ठेवला. यामुळे नागपूर, अमरावतीसह विदर्भातील लाखो विद्यार्थी आणि पालकांना दिलासा मिळाला आहे.

दरम्यान, शाळा सुरू होण्यापूर्वी आवश्यक शैक्षणिक आणि प्रशासकीय तयारी पूर्ण करण्याचे निर्देश शिक्षण विभागाने संबंधित यंत्रणांना दिले आहेत.

### अनेक राज्यांसाठी दिला ऑरेंज अलर्ट

# उत्तर भारतात गारपिट तसेच वादळी पावसाचा इशारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : भारतीय हवामान विभागाने ११ जून रोजी देशातील अनेक भागांत हवामान खराब राहण्याचा इशारा दिला आहे. पश्चिमी विक्षोभाच्या प्रभावामुळे वायव्य भारतात मेघगर्जनेसह वादळ, जोरदार वारे आणि काही ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. पंजाब, हरियाणा, चंदीगड, दिल्ली, राजस्थान, उत्तर प्रदेश, हिमाचल प्रदेश, जम्मू-काश्मीर आणि उत्तराखंडसाठी ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, या भागांत ताशी ६० ते ७० किलोमीटर वेगाने वारे वाहण्याची शक्यता असून काही ठिकाणी वाऱ्याचा वेग ८० किलोमीटर प्रतितासपर्यंत जाऊ शकतो. दिल्ली-एनसीआरमध्ये दिवसभर ढगाळ वातावरण राहण्यासह संध्याकाळी किंवा रात्री हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे.



उत्तर प्रदेश आणि राजस्थानच्या काही भागांत धुळीचे वादळ येण्याची शक्यता असून नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. बिहारमध्येही मेघगर्जनेसह वादळी वारे आणि काही भागांत मुसळधार पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. झारखंडमध्ये १२ आणि १३ जून रोजी मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. दरम्यान, मान्सूनच्या प्रगतीमुळे ईशान्य भारतातही जोरदार पावसाची शक्यता आहे. अरुणाचल प्रदेश, आसाम, मेघालय, सिक्कीम, उत्तर बंगाल आणि ओडिशातील काही भागांत मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे. हवामान विभागाच्या माहितीनुसार, नैऋत्य मान्सूनची पुढील वाटचाल अनुकूल असून येत्या तीन ते चार दिवसांत महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा, आंध्र प्रदेश, तामिळनाडू, पश्चिम बंगाल, झारखंड, बिहार, ओडिशा आणि छत्तीसगडच्या आणखी काही भागांत मान्सून सक्रिय होण्याची शक्यता आहे. नागरिकांनी स्थानिक प्रशासन आणि हवामान विभागाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# नेहरू आणि मोदी यांच्यात तुलना होऊ शकत नाही

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : शरद पवार यांनी माजी पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या राष्ट्र उभारणीतील योगदानाचे कौतुक करत त्यांची तुलना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी होऊ शकत नाही, असे स्पष्ट केले.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या २७ व्या वर्धापन दिनानिमित्त वाय. बी. चव्हाण सेंटर येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. पवार म्हणाले, राष्ट्र उभारणी आणि स्वातंत्र्यलढ्यातील नेहरूंचे योगदान विसरता येणार नाही. महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखालील स्वातंत्र्य आंदोलनात त्यांनी अनेक वर्षे तुरुंगवास भोगला होता. त्यांच्या त्यागाचा आणि योगदानाचा आदर केला पाहिजे.



पंतप्रधान नरेंद्र मोदी हे देशातील सर्वाधिक काळ पदावर राहिलेल्या पंतप्रधानांपैकी एक बनल्याचे नमूद करत पवार म्हणाले, संसदीय लोकशाहीत पंतप्रधानपदाचा आदर केला पाहिजे. मात्र, नेहरू हे नेहरूच आहेत आणि भारतीय जनता त्यांचे योगदान विसरू शकत नाही. यावेळी त्यांनी केंद्र सरकारवरही टीका करत शेतकरी, सुशिक्षित बेरोजगार आणि महिलांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप केला. तसेच देशाच्या परराष्ट्र धोरणाबाबतही त्यांनी असमाधान व्यक्त केले.

## संपादकीय

### सायबर गुलामगिरीचे भयावह वास्तव



**परदेशातील आकर्षक नोकऱ्यांच्या आमिषाने युवकांना सायबर फसवणूक केंद्रांमध्ये अडकविण्याचे प्रकार वाढत आहेत. डिजिटल युगातील ही नवी सायबर गुलामगिरी केवळ आर्थिक गुन्हा नसून मानव तस्करी आणि सक्तीच्या मजुरीचे भयावह रूप आहे. या धोक्याविरोधात समाजाने अधिक सजग राहण्याची गरज आहे.**

डिजिटल युगाने रोजगाराच्या असंख्य संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. आज जगातील कोणत्याही देशातील कंपनीसाठी घरबसल्या काम करणे शक्य झाले आहे. मात्र, या वाढत्या डिजिटल संधींसोबत फसवणुकीच्या नव्या पद्धतीही विकसित झाल्या आहेत. अलीकडे केंद्रीय अन्वेषण विभाग (सीबीआय)ने उघडकीस आणलेल्या एका प्रकरणाने या धोकादायक वास्तवाकडे पुन्हा एकदा देशाचे लक्ष वेधले आहे. परदेशातील आकर्षक नोकऱ्यांच्या आमिषाने भारतीय युवकांना दक्षिणपूर्व आशियातील सायबर फसवणूक केंद्रांमध्ये पाठवले जात असल्याचे आरोप या तपासातून समोर आले आहेत. प्राथमिक तपासानुसार, काही आरोपी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म, मेसेजिंग ॲप्स आणि ऑनलाइन जॉब पोर्टल्सच्या माध्यमातून युवकांशी संपर्क साधत होते. माहिती तंत्रज्ञान, डिजिटल मार्केटिंग, डेटा एंट्री, ग्राहक सहाय्य यांसारख्या क्षेत्रांमध्ये उच्च पगाराच्या नोकऱ्यांचे आश्वासन दिले जात होते. आकर्षक वेतन, मोफत निवास व्यवस्था आणि जलद करिअर प्रगती यांसारख्या गोष्टींचा उल्लेख करून अनेकांना परदेशात जाण्यास प्रवृत्त केले जात होते. तपास यंत्रणांच्या माहितीनुसार, काही युवकांना थायलंडमार्गे म्यानमार आणि कंबोडियासारख्या देशांमध्ये नेण्यात आले. तेथे पोहोचल्यानंतर त्यांची परिस्थिती पूर्णपणे बदलत असल्याचे अनेक अहवालांमधून समोर आले आहे. काही प्रकरणांमध्ये पासपोर्ट जप्त करणे, हालचालींवर निर्बंध आणणे आणि कठोर देखरेखीखाली काम करण्यास भाग पाडणे यांसारख्या बाबींचा उल्लेख करण्यात आला आहे. पीडितांच्या कथनांनुसार, त्यांना ऑनलाइन आर्थिक फसवणूक, बनावट गुंतवणूक योजना, क्रिप्टोकरन्सी घोटाळे किंवा रोमांस स्कॅमशी संबंधित कामांमध्ये सहभागी होण्यासाठी दबाव टाकला जात होता. ही समस्या केवळ भारतापुरती मर्यादित नाही. संयुक्त राष्ट्रसंघ तसेच विविध आंतरराष्ट्रीय संस्थांनी यापूर्वीही म्यानमार, कंबोडिया आणि लाओस या भागांमध्ये कार्यरत असलेल्या तथाकथित सायबर स्कॅम कंपाऊंड्सबाबत चिंता व्यक्त केली आहे. अनेक अहवालांनुसार, आशियातील विविध देशांतील नागरिकांना फसव्या रोजगाराच्या आश्वासनांद्वारे अशा केंद्रांमध्ये नेले जाते आणि त्यांच्याकडून बळजबरीने काम करून घेतले जाते. त्यामुळे या प्रकाराकडे केवळ सायबर गुन्हेगारी म्हणून नव्हे, तर आधुनिक मानव तस्करी आणि सक्तीच्या मजुरीच्या गंभीर स्वरूपात पाहिले जात आहे. या प्रकरणातून काही महत्त्वाचे प्रश्न निर्माण होतात. पहिला प्रश्न म्हणजे बेरोजगारी आणि जलद आर्थिक प्रगतीच्या इच्छेचा गैरफायदा घेतला जात आहे का? अनेक युवक चांगल्या संधींच्या शोधात परदेशी नोकऱ्यांचा विचार करतात. परंतु, पुरेशी पडताळणी न करता घेतलेले निर्णय त्यांना धोकादायक परिस्थितीत ढकलू शकतात. दुसरा प्रश्न म्हणजे डिजिटल प्लॅटफॉर्मवरील बनावट रोजगार जाहिरातींवर कितपत प्रभावी नियंत्रण आहे? सोशल मीडिया आणि ऑनलाइन नेटवर्किंगच्या युगात फसवणूक करणाऱ्यांना संभाव्य बळींपर्यंत पोहोचणे अधिक सोपे झाले आहे. या पार्श्वभूमीवर सरकार, तपास यंत्रणा, तंत्रज्ञान कंपन्या आणि नागरिक या सर्वांची भूमिका महत्त्वाची ठरते. परदेशी नोकऱ्यांसाठी काम करणाऱ्या एजन्सी आणि भरती प्रक्रियेवर अधिक कठोर देखरेख आवश्यक आहे. संशयास्पद जाहिराती आणि फसव्या नेटवर्क्सवर जलद कारवाई करण्यासाठी सोशल मीडिया कंपन्यांनीही अधिक जबाबदारी स्वीकारली पाहिजे. तसेच, परराष्ट्र मंत्रालय, कायदा अंमलबजावणी संस्था आणि संबंधित देशांमधील यंत्रणांमध्ये अधिक प्रभावी समन्वय असणे गरजेचे आहे. युवकांनीही काही मूलभूत खबरदारी घेणे आवश्यक आहे. कोणतीही परदेशी नोकरी स्वीकारण्यापूर्वी कंपनीची अधिकृत नोंदणी, रोजगार करार, व्हिसा प्रक्रिया आणि संबंधित सरकारी मान्यता यांची पडताळणी करणे अत्यावश्यक आहे. केवळ सोशल मीडिया संदेश, अनोळखी एजंट किंवा अविश्वसनीय संकेतस्थळांवर आधारित निर्णय घेणे टाळले पाहिजे. अत्यंत आकर्षक वाटणाऱ्या ऑफर्सकडे नेहमीच चिकित्सक दृष्टीकोनातून पाहणे आवश्यक आहे. सायबर गुलामगिरीचे हे प्रकरण डिजिटल युगातील एका नव्या आणि चिंताजनक वास्तवाची जाणीव करून देते. तंत्रज्ञानामुळे जग अधिक जोडले गेले असले तरी त्याच तंत्रज्ञानाचा वापर करून शोषणाच्या नव्या पद्धतीही विकसित होत आहेत. त्यामुळे कायद्याची अंमलबजावणी, जनजागृती आणि आंतरराष्ट्रीय सहकार्य या तिन्ही गोष्टी समान महत्त्वाच्या ठरतात. आकर्षक नोकरीच्या आश्वासनामागे कधी कधी मानव तस्करी आणि सक्तीच्या मजुरीचे जाळे दडलेले असू शकते, याची जाणीव प्रत्येकाने बाळगण्याची गरज आहे. आधुनिक काळातील या नव्या स्वरूपाच्या गुलामगिरीविरुद्ध लढा देण्यासाठी समाजाने अधिक सजग, जबाबदार आणि सतर्क राहणे हीच काळाची गरज आहे.

---

### शहरात झळकणाऱ्या जाहिरातींमधून पालिकेला उत्पन्नच नाही

# जाहिरात धोरणाअभावी कोट्यवधींचा फटका

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी** : शहरातील विद्युत खांब, गॅन्ट्री, उड्डाणपूल आणि भुयारी मार्गांवर मोठ्या प्रमाणात जाहिराती झळकत असल्या तरी त्यातून महापालिकेला कोणतेही उत्पन्न मिळत नसल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. जाहिरात धोरण अद्याप निश्चित न झाल्याने महापालिकेच्या महसुलाला दरवर्षी कोट्यवधी रुपयांचा फटका बसत असल्याची माहिती पुढे आली आहे.

शहरात महापालिकेचे सुमारे १ लाख १४ हजारांहून अधिक विद्युत खांब आहेत. त्यापैकी अनेक खांबांवर किऑक्सच्या माध्यमातून जाहिराती लावल्या जात आहेत. बांधकाम व्यावसायिक, शैक्षणिक संस्था, क्लासेस तसेच विविध व्यावसायिक आस्थापनांकडून या माध्यमाचा वापर केला जातो. मात्र, या जाहिरातींमधून मिळणारे उत्पन्न महापालिकेकडे न जाता खासगी एजन्सींकडे जात असल्याचा



आरोप केला जात आहे.

शहरातील प्रमुख रस्त्यांवरील ९७ गॅन्ट्रींवरही वाढदिवस, सण-उत्सव, सामाजिक कार्यक्रम आणि राजकीय जाहिराती मोठ्या प्रमाणावर लावल्या जातात. याशिवाय शहरातील सुमारे ८० उड्डाणपूल आणि भुयारी मार्गांवरही जाहिरातींचे फलक दिसून येतात. मात्र, या ठिकाणी जाहिरातबाजीसाठी कोणतेही ठोस धोरण नसल्याने महापालिकेला महसूल मिळत नसल्याचे चित्र आहे. महापालिकेच्या आकाशचिन्ह व परवाना विभागाला यामुळे मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे. दुसरीकडे, राजकीय नेते, पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते आणि व्यावसायिक मंडळी सार्वजनिक जागांचा वापर करून विनामूल्य प्रसिद्धी मिळवत असल्याची टीका होत आहे.

दरम्यान, विद्युत खांब, गॅन्ट्री, उड्डाणपूल आणि भुयारी मार्गांवरील जाहिरातींना कायदेशीर स्वरूप देण्यासाठी महापालिकेने निविदा प्रक्रिया सुरू केली असून त्यातून वार्षिक सुमारे २० कोटी रुपयांचे उत्पन्न मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. संबंधित निविदांना जाहिरात एजन्सींचा प्रतिसादही मिळाला असून स्थायी समितीची मंजुरी मिळाल्यानंतर प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू होणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

याशिवाय बसथांबे, डीपी बॉक्स, सीमाभिंती, दिशादर्शक फलक आणि झाडांवरही मोठ्या प्रमाणावर विनापरवाना पोस्टर्स लावली जात असल्याने शहराचे विद्रूपीकरण होत असल्याची नागरिकांची तक्रार आहे. या प्रकारांवर अधिक कठोर कारवाई करण्याची मागणीही पुढे येत आहे.

---

## टोईंग कारवाईसाठी शहरात नवे नियम

### गणवेश व ओळखपत्र अनिवार्य; अरेरावी आणि उद्धट वर्तनाची दखल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी** : टोईंग व्हॅनवरील कर्मचाऱ्यांकडून होणारी अरेरावी, उद्धट वर्तन तसेच गणवेश आणि ओळखपत्राशिवाय सुरू असलेल्या कारभाराच्या तक्रारींची दखल घेत पिंपरी-चिंचवड वाहतूक विभागाने टोईंग कारवाईसाठी नवे आणि कडक नियम लागू केले आहेत. नव्याने नियुक्त झालेले पोलिस उपायुक्त (वाहतूक) विक्रांत देशमुख यांनी पदभार स्वीकारल्यानंतर या संदर्भात आदेश जारी केले आहेत.

शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी आणि नो-पार्किंगमधील वाहनांवर कारवाई करण्यासाठी टोईंग व्हॅनचा वापर केला जातो. मात्र, वाहन



उचलताना काही कर्मचाऱ्यांकडून वाहनचालकांशी उद्धटपणे वागणे, योग्य माहिती न देणे तसेच गणवेश आणि ओळखपत्राशिवाय काम करणे अशा तक्रारी सातत्याने समोर येत होत्या. नागरिकांच्या या तक्रारींची गंभीर दखल घेत वाहतूक विभागाने शिस्त, पारदर्शकता आणि जबाबदारी निश्चित करण्यासाठी नवीन नियमावली लागू केली आहे.

नवीन आदेशानुसार, गणवेशाशिवाय कोणत्याही टोईंग कर्मचाऱ्याला कारवाई करण्याची परवानगी दिली जाणार नाही. तसेच सर्व कर्मचाऱ्यांनी अधिकृत ओळखपत्र गळ्यात परिधान करणे बंधनकारक करण्यात आले आहे. या नियमांचे पालन न करणाऱ्या कर्मचाऱ्यांना कामकाजापासून दूर ठेवण्याचा इशाराही देण्यात आला आहे. याशिवाय टोईंग करणाऱ्या सर्व वाहनांवर आवश्यक परवाने, वैध कागदपत्रे आणि अधिकृत माहिती स्पष्टपणे प्रदर्शित करणे अनिवार्य करण्यात आले आहे. आवश्यक माहिती नसलेल्या वाहनांकडून टोईंग कारवाई केली जाऊ नये, असे निर्देशही देण्यात आले आहेत. टोईंग कारवाईपूर्वी संबंधित कर्मचाऱ्यांकडे गणवेश, ओळखपत्र आणि आवश्यक कागदपत्रे उपलब्ध असल्याची खात्री करण्याची जबाबदारी वाहतूक शाखेतील प्रभारी अधिकारी आणि अंमलदारांवर सोपविण्यात आली आहे. नियमांचे पालन न झाल्यास संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवरही जबाबदारी निश्चित केली जाणार असल्याचे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे. वाहनचालकांकडून या निर्णयाचे स्वागत करण्यात आले आहे.

---

## पुणे जिल्ह्यात पाच वर्षांत ३,४७० जणांना नेत्रदानाचा लाभ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : नेत्रदानाच्या माध्यमातून दुसऱ्यांच्या आयुष्यात प्रकाश पेरण्याची प्रेरणादायी चळवळ पुणे जिल्ह्यात अधिक बळकट होत असल्याचे चित्र आहे. जिल्हा आरोग्य विभागाच्या आकडेवारीनुसार, २०२१ ते २०२६ या कालावधीत एकूण ३ हजार ४७० नेत्रबुबुळ प्रत्यारोपण शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडल्या असून हजारो दृष्टीहीनांना नव्याने जग पाहण्याची संधी मिळाली आहे.

मृत्यूनंतरही दुसऱ्याच्या आयुष्यात प्रकाश निर्माण करणारे नेत्रदान हे महादान मानले जाते. पुणे जिल्ह्यात या चळवळीला नागरिकांचा वाढता प्रतिसाद मिळत असून त्यामागे दानशूर व्यक्ती, नेत्रपेढ्या, वैद्यकीय तज्ज्ञ आणि आरोग्य यंत्रणेचे सातत्यपूर्ण प्रयत्न कारणीभूत ठरत



आहेत. सन २०२३-२४ या वर्षात नेत्रदान संकलनाचे १ हजार २२६ इतके उद्दिष्ट निश्चित करण्यात आले होते. त्यापैकी ११७ टक्क्यांहून अधिक साध्यता प्राप्त करत जिल्ह्याने उल्लेखनीय कामगिरी नोंदविली.

महापालिका आणि शासकीय आरोग्य यंत्रणांच्या माध्यमातून ग्रामीण तसेच शहरी भागात राबविण्यात येणाऱ्या जनजागृती उपक्रमांमुळे नागरिकांमध्ये नेत्रदानाबाबत सकारात्मकता वाढली आहे. मृत्यूनंतर नेत्रदानाचा संकल्प करण्याकडे अनेक कुटुंबांचा कल वाढत असल्याचे आरोग्य विभागाने नमूद केले आहे.

---

## वारस नोंदीसाठी ७० हजारांची लाच घेताना तलाठ्याला अटक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : वडिलोपार्जित जमिनीच्या वारस नोंदीसाठी लाच मागितल्याप्रकरणी भ्रष्टाचार प्रतिबंधक विभागाने चऱ्होळी बुद्रुक येथील तलाठी आणि एका खासगी एजंटला रंगेहाथ पकडून अटक केली आहे. या कारवाईमुळे महसूल विभागात खळबळ उडाली आहे.

भ्रष्टाचार प्रतिबंधक विभागाच्या पोलिस निरीक्षक शैलजा शशिकांत शिंदे यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे. त्यानुसार, चऱ्होळी बुद्रुक येथील ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) सुनील भिकाजी सातोसे (वय ४४) यांनी तक्रारदाराच्या आजोबांच्या वडिलोपार्जित जमिनीच्या वारस नोंदीसाठी सुरुवातीला १ लाख ८० हजार रुपयांची लाच मागितली होती. पडताळणीदरम्यान ही रक्कम कमी करून ७० हजार रुपये देण्याचे ठरले. त्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचला. तलाठी सातोसे यांच्या सांगण्यावरून त्यांचा सहकारी एजंट नेमाजी माधवराव भोकरे (वय ४०) याने तक्रारदाराकडून ७० हजार रुपयांची लाच स्वीकारली. लाच स्वीकारताच पथकाने दोघांनाही ताब्यात घेत अटक केली.

या प्रकरणी भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ मधील कलम ७ आणि १२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. नागरिकांना शासकीय कामांसाठी कोणी लाचेची मागणी केल्यास तातडीने विभागाशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

---

## दहा अनधिकृत प्रार्थनास्थळांवर कारवाई

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी** : पिंपरी-चिंचवड महापालिकेने चिखली येथील कुडळवाडी आणि पवारवस्ती परिसरात अतिक्रमणविरोधी मोहीम तीव्र करत मंगळवारी पहाटे दहा अनधिकृत प्रार्थनास्थळांवर कारवाई केली.

दरम्यान, मोठ्या पोलिस बंदोबस्तात करण्यात आलेल्या या कारवाईदरम्यान काही नागरिकांनी विरोध दर्शवत दगडफेक केल्याची घटना घडली. मात्र, या घटनेत महापालिकेचे कोणतेही अधिकारी किंवा कर्मचारी जखमी झाले नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.

महापालिकेच्या बांधकाम परवानगी विभागाने ‘क’ आणि ‘फ’ क्षेत्रीय कार्यालयांच्या सहकार्याने ही कारवाई राबविली. महापालिका तसेच खासगी जागेवरील अनधिकृत प्रार्थनास्थळे हटविण्यात आली. कारवाईदरम्यान परिसरातील प्रमुख रस्ते वाहतुकीसाठी बंद करण्यात आले होते.

या मोहिमेत २२ पोकलेन, २६ जेसीबी आणि सुमारे १२० मजुरांचा सहभाग होता. खबरदारीचा उपाय म्हणून घटनास्थळी चार अग्निशमन वाहने आणि दोन रुग्णवाहिका तैनात करण्यात आल्या होत्या. सहशहर अभियंता सुनील भागवानी, क्षेत्रीय अधिकारी अजिंक्य येळे, अतुल पाटील, विविध विभागांचे उपआयुक्त, सहाय्यक आयुक्त, क्षेत्रीय अधिकारी, कार्यकारी अभियंता सूर्यकांत मोहिते तसेच इतर अधिकारी आणि कर्मचारी कारवाईवेळी उपस्थित होते.

महापालिकेच्या बांधकाम परवानगी विभागाने गेल्या वर्षी कुडळवाडी परिसरातील ३१ अनधिकृत धार्मिक स्थळांना नोटिसा बजावल्या होत्या. त्यापैकी आतापर्यंत १५ स्थळांवर कारवाई करण्यात आली असून, मंगळवारी आणखी १० प्रार्थनास्थळे हटविण्यात आली. उर्वरित १६ अनधिकृत धार्मिक स्थळांवरही लवकरच कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली.

कुडळवाडी परिसर अनेक वर्षांपासून अनधिकृत बांधकामे, पत्राशेड, भंगार डेपो, गोदामे, लघुउद्योग आणि व्यावसायिक वापरामुळे चर्चेत आहे. फेब्रुवारी २०२५ मध्ये तत्कालीन आयुक्त शेखर सिंह यांच्या नेतृत्वाखाली या भागात सात दिवस विशेष मोहीम राबविण्यात आली होती.

त्या वेळी ४ हजार ५०० हून अधिक भंगार डेपो, दुकाने, लघुउद्योग आणि अनधिकृत बांधकामांवर कारवाई करून सुमारे ८२५ एकर जागा अतिक्रमणमुक्त करण्यात आली होती.

दरम्यान, वारंवार एकाच भागात कारवाई होत असल्याने स्थानिक नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. राजकीय दबावामुळे कुडळवाडी परिसराला लक्ष्य केले जात असल्याचा आरोप काही नागरिकांनी केला आहे.

शहरातील अनधिकृत बांधकामांबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही. शहरातील पायाभूत सुविधा, सुरक्षितता आणि कायद्याचे पालन सुनिश्चित करण्यासाठी अशा कारवाया पुढेही सुरू राहतील.

नागरिकांनी आवश्यक परवानग्या घेऊनच बांधकाम करावे, असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी केले.

---

## अतिक्रमण हटविण्याच्या कारवाईदरम्यान दगडफेक

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पिंपरी** : पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून कुडळवाडी परिसरातील अनधिकृत धार्मिक बांधकामांवर कारवाई सुरू असताना जमावाने पोलिस व प्रशासनाच्या पथकावर दगडफेक केल्याची घटना मंगळवारी मध्यरात्री घडली. या प्रकरणी चिखली पोलिसांनी ३३ नामनिर्देशित आरोपींसह ३०० ते ५०० अज्ञात व्यक्तींविरुद्ध विविध गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ९ जून रोजी रात्री साडेबारा वाजण्याच्या सुमारास कुडळवाडी येथील किंग काट्या परिसरात, नायरा पेट्रोल पंपाजवळ महापालिकेची अतिक्रमण हटविण्याची कारवाई सुरू होती. यावेळी मोठा जमाव एकत्र जमला आणि शासकीय कामात अडथळा आणण्याच्या उद्देशाने पोलिस तसेच प्रशासनाच्या पथकावर दगडफेक करण्यात आली. या दगडफेकीत काही पोलिस अधिकारी आणि कर्मचारी जखमी झाले. तसेच शासकीय वाहनांसह इतर वाहनांचे नुकसान झाल्याचे पोलिसांनी सांगितले. जमावाने लागू असलेल्या प्रतिबंधात्मक आदेशाचे उल्लंघन केल्याचाही आरोप करण्यात आला आहे.

याप्रकरणी सहाय्यक पोलिस निरीक्षक राम गोविंदराव गोमारे यांनी चिखली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार भारतीय न्याय संहितेअंतर्गत शासकीय कामात अडथळा निर्माण करणे, बेकायदेशीर जमाव जमविणे, दंगल घडविणे, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणे आदी विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी या प्रकरणातील मुख्य आरोपी नाजिम नईम चौधरी आणि एजाज वकार चौधरी यांना अटक केली असून न्यायालयाने त्यांना ११ जूनपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. तसेच इतर आरोपींपैकी काहींना बुधवारी सकाळी ताब्यात घेऊन त्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. या घटनेनंतर परिसरात तणावपूर्ण शांतता असून चिखली पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

**आधारच्या वादातून महिलेला मारहाण**

**तळेगाव दाभाडे** : आधार कार्डाच्या कारणावरून झालेल्या वादातून एका महिलेला मारहाण केल्याची घटना तळेगाव दाभाडे येथे घडली.

याप्रकरणी एका व्यक्तीविरुद्ध तळेगाव दाभाडे पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हा प्रकार ८ जून रोजी सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास तळेगाव दाभाडे येथील मंत्रा सिटी, ए-विंगमधील फ्लॅट क्रमांक ३०७ येथे घडला. याप्रकरणी सुरेखा सोमा भांडे (वय ३७, रा. मंत्रा सिटी, तळेगाव दाभाडे) यांनी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार, सागर पंढरीनाथ राजगुरू हा त्यांच्या घरी आला होता. आधार कार्ड काढण्याच्या कारणावरून दोघांमध्ये वाद झाला. वाद वाढल्यानंतर आरोपीने फिर्यादीला शिवीगाळ केली. त्यानंतर रागाच्या भरात घरातील ट्रायसायकल अंगावर फेकून मारहाण केल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. या घटनेत सुरेखा भांडे यांच्या हात व पायाला दुखापत झाली असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी तळेगाव दाभाडे पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीला अद्याप अटक करण्यात आलेली नसून पुढील तपास पोलिस करीत आहेत.

**किरकोळ वादातून दगडफेक**

**पिंपरी** : किरकोळ कारणावरून झालेल्या वादातून एका युवकावर दगडाने हल्ला करून जखमी केल्याची घटना पिंपरीतील बौद्धनगर परिसरात घडली. याप्रकरणी पिंपरी पोलिसांनी एका युवकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. हा प्रकार ८ जून रोजी रात्री सुमारे १० वाजण्याच्या सुमारास बौद्धनगर येथे घडला. याप्रकरणी शाहिद तैमूर शेख (वय २७, रा. बौद्धनगर, पिंपरी) यांनी पिंपरी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार, त्याच परिसरात राहणाऱ्या जाल्ला उर्फ मेहताब शेख (वय १८) याने फिर्यादी आणि त्यांचा भाऊ साहिल यांना शिवीगाळ केली. त्यानंतर वाद वाढल्याने आरोपीने दोघांनाही मारहाण केली.

---

## चाकणमध्ये घरगुती गॅसचा काळाबाजार उघड

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चाकण** : घरगुती गॅस सिलिंडरमध्ये बेकायदेशीररीत्या गॅस भरून त्याची अवैध विक्री केल्याप्रकरणी एका युवकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याला अटक करण्यात आली आहे.

ही कारवाई पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीतील चाकण उत्तर पोलिस ठाण्याच्या पथकाने केली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ९ जून रोजी सायंकाळी ६.४५ वाजण्याच्या सुमारास चाकण गावातील चक्रेश्वर मंदिर ते मेदणकरवाडी फाटा रस्त्यालगत त्रिशूळ चौकाजवळील कल्पहोम द्वारकामाई सोसायटीसमोर ही कारवाई करण्यात आली. व्यावसायिक वापराच्या गॅस टाक्यांमधून घरगुती गॅस सिलिंडरमध्ये बेकायदेशीररीत्या गॅस भरला जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती.

याप्रकरणी निखील अनिल झोडपे (वय २२, रा. कुस्ती, ता. खेड, जि. पुणे) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी कोणतीही सुरक्षा साधने न वापरता व्यावसायिक गॅस टाक्यांमधून घरगुती गॅस सिलिंडरमध्ये गॅस भरत असल्याचे तपासात निष्पन्न झाले. या प्रकरणी चाकण उत्तर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### हुंड्यासाठी विवाहितेचा छळ; पोलिसांत फिर्याद

**लोणी काळभोर** : हवेली तालुक्यात एका २३ वर्षीय विवाहितेचा हुंड्यासाठी मानसिक व शारीरिक छळ करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. लग्नानंतर काही दिवसांतच पाच लाख रुपयांच्या हुंड्याची मागणी करण्यात आली. तसेच सतत टोमणे मारणे, गर्भपातासाठी दबाव टाकणे आणि सात महिन्यांच्या गर्भवती अवस्थेत माहेरी पाठवून दिल्याचा आरोप संबंधित विवाहितेने केला आहे. या प्रकरणी दहा महिन्यांच्या मुलीसह माहेरी राहत असलेल्या समीक्षा प्रज्योत बांगर (वय २३, सध्या रा. आळंदी म्हातोबाची, ता. हवेली, मूळ रा. बांगरवस्ती, केसनंद) यांनी थेऊर पोलीस चौकीत फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार, सासूची सेवा करण्यासाठी घाईघाईने विवाह लावून दिला गेला. त्यानंतर काही दिवसांतच पाच लाख रुपयांच्या हुंड्याची मागणी करण्यात आली. मागणी पूर्ण न झाल्याने विवाहितेला मानसिक आणि शारीरिक त्रास देण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच गर्भधारणेदरम्यान गर्भपात करण्यासाठी दबाव टाकण्यात आल्याचेही फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

### शेतजमिनीच्या वादातून हल्ला; तिघे जखमी

**शिरूर** : तालुक्यातील निमगाव दुडे येथे शेतजमिनीच्या वादातून एकाच कुटुंबातील सदस्यांमध्ये संघर्ष उफाळून आला. चुलत भावाने मिरचीपूड फेकून दांडक्याने मारहाण केल्याच्या घटनेत शेतकरी, त्यांची पत्नी आणि वडील जखमी झाले आहेत. तसेच उपचारासाठी रुग्णालयात जात असतानाही काही जणांनी धमकी दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. याप्रकरणी ज्ञानेश्वर संपत गायकवाड (वय ४०, रा. निमगाव दुडे, ता. शिरूर) यांनी शिरूर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार नितीन बाळासाहेब गायकवाड, मालती बाळासाहेब गायकवाड, राहुल घोडे आणि शिवाजी घोडे यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### वळती येथील शेतकऱ्याच्या २०० ते २५० पिशव्या सडल्या

# अवकाळीचा कांदा पिकाला मोठा फटका

■ दैनिक राज्य लोकतंत्र



नुकसान: वळती (ता. आंबेगाव) येथील शेतकरी सुदाम लोखंडे यांच्या कांदा बराकीतील कांदा मोठ्या प्रमाणावर सडला आहे. (छाया : किशोर खुडे)

**पारगाव** : आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात गेल्या मे महिन्यात दोन वेळा झालेल्या अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. कांदा काढणीची कामे सुरू असतानाच आलेल्या पावसामुळे उघड्यावर ठेवलेला कांदा पूर्णपणे भिजला. त्यानंतर तो वाचवण्यासाठी शेतकऱ्यांनी कांदा बराकीत साठवून ठेवला; मात्र आता त्याच कांद्याला सड लागल्याने शेतकऱ्यांसमोर मोठे आर्थिक संकट उभे ठाकले आहे.

तालुक्यातील वळती येथील कांदा उत्पादक शेतकरी सुदाम नानाभाऊ लोखंडे यांना या परिस्थितीचा मोठा फटका बसला आहे. कांदा काढणी सुरू असतानाच झालेल्या सलग दोन अवकाळी पावसामुळे त्यांचा मोठ्या प्रमाणावर कांदा भिजला. सुरुवातीला तो साठवून ठेवला असला तरी आता तब्बल २०० ते २५० कांद्याच्या पिशव्या सडून गेल्या असून लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

कांदा उत्पादनासाठी रोपे, लागवड, खुरपणी, खते, औषध फवारणी, सिंचन तसेच काढणीसाठी मजुरी अशा विविध बाबींवर मोठी गुंतवणूक करण्यात आली होती. मात्र, पावसामुळे झालेल्या नुकसानीनंतर हे भांडवल परत मिळणेही कठीण झाले असल्याने सुदाम लोखंडे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. ही परिस्थिती केवळ एका शेतकऱ्यापुरती मर्यादित नसून आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील अनेक कांदा उत्पादकांना याच समस्येला सामोरे जावे लागत आहे. अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे भिजलेला कांदा बराकीत सडत असल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. एकीकडे कांद्याला समाधानकारक बाजारभाव मिळत नसताना, दुसरीकडे निसर्गाच्या लहरीपणामुळे उत्पादनही वाया जात असल्याने शेतकरी दुहेरी संकटात सापडले आहेत. त्यामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे तातडीने पंचनामे करून त्यांना आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी होत आहे.

## रानमळा परिसरात बिबट्याचा वाढता वावर; ग्रामस्थ धास्तावले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी** : आंबेगाव तालुक्यातील रानमळा परिसरात गेल्या काही दिवसांपासून बिबट्याचा वावर वाढल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. लोणी-रानमळा मार्गावर बिबट्या वारंवार दिसत असून, रस्ता ओलांडताना त्याचे दर्शन होणे नित्याचे झाल्याची माहिती ग्रामस्थांनी दिली.

मध्यंतरी याच मार्गावर एका दुचाकीस्वारावर बिबट्याने हल्ला केल्याची घटनाही घडली होती. त्यामुळे नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण असून शेतकरी आणि ग्रामस्थांमध्ये दहशत पसरली आहे. राध्या ते रानमळा आणि लोणी मार्गावर बिबट्या ऐटीत रस्ता ओलांडत असल्याचे चित्र अनेकांनी पाहिल्याचे सांगितले. बिबट्याचा वाढता वावर लक्षात घेऊन वनविभागाने परिसरात दोन पिंजरे लावले आहेत. मात्र, लोणी-रानमळा येथील ओढ्याच्या उजव्या बाजूस आणखी एक पिंजरा बसविण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

दोन दिवसांपूर्वी जुन्या बैलगाडा घाट परिसरात रात्रीच्या वेळी भिमा जिते यांच्या घराजवळील घोडीच्या पिलावर बिबट्याने हल्ला करून त्यास जखमी केल्याची घटना घडली. या प्रकारानंतर परिसरातील शेतकरी अधिकच सतर्क झाले असून अनेक ठिकाणी शेतीची कामेही प्रभावित झाल्याचे दिसून येत आहे.

वनविभागाने तातडीने आवश्यक उपाययोजना करून बिबट्याचा बंदोबस्त करावा, अशी मागणी रानमळाचे सरपंच राजू सिनलकर यांनी केली आहे. बिबट्या दिसल्यास त्वरित वनविभागाला माहिती देण्याचे आवाहनही वनविभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

मात्र, एखादी गंभीर घटना घडण्यापूर्वीच वनविभागाने अधिक प्रभावी पावले उचलावीत, अशी अपेक्षा ग्रामस्थांकडून व्यक्त केली जात आहे.

## कृषीकन्यांचे उत्साहात स्वागत



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी** : आंबेगाव तालुक्यातील निरगुडसर येथे महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी अंतर्गत डॉ. डी. वाय. पाटील कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, आकुर्डी येथील कृषीकन्यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले. ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत या कृषीकन्या पुढील सात आठवडे गावात वास्तव्यास राहून शेतकऱ्यांना विविध कृषी विषयांवर प्रत्यक्ष मार्गदर्शन करणार आहेत.

या उपक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. डी. जगताप, उपप्राचार्य तथा कार्यक्रम समन्वयक डॉ. एस. एन. पाटील आणि प्रा. भक्ती चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले आहे. स्नेहल नेहुल, भाग्यश्री नंदीवाले, श्रद्धा निकम, आरती गावित, अंशुज इंगोले आणि हर्षिता एरुगुराला या कृषीकन्या कार्यक्रमात सहभागी झाल्या आहेत.

कार्यक्रमाच्या कालावधीत माती परीक्षण, पाणी व्यवस्थापन, पीक संरक्षण, कीड व रोग नियंत्रण, आधुनिक शेती तंत्रज्ञान, शेतीमाल प्रक्रिया आणि विपणन यांसंदर्भात शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे. कृषीकन्यांच्या माध्यमातून गावात वैज्ञानिक शेती पद्धती आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रसार होऊन शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळेल, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला.

यावेळी निरगुडसरचे सरपंच रविंद्र वळसे पाटील, ग्रामविकास अधिकारी संपत पांढरे तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रामस्थांनी कृषीकन्यांचे स्वागत करून त्यांच्या कार्यास शुभेच्छा दिल्या.

## आंबेगाव पूर्व भागात हुमणीचा प्रादुर्भाव

### शेतकऱ्यांना सामुदायिक उपाययोजनांचे आवाहन

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**लोणी-धामणी** : आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात हुमणी अळीच्या प्रादुर्भावाची चिन्हे दिसू लागल्याने शेतकऱ्यांना तातडीने प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या किडीच्या भुंगेरा अवस्थेव्यतिरिक्त बहुतेक सर्व अवस्था जमिनीखालीच होत असल्याने मे-जून महिन्यात वळवाच्या पावसाच्या काळात सामुदायिकरीत्या नियंत्रणाचे प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे कृषी तज्ज्ञांनी सांगितले.

मे-जूनमधील वळवाच्या पावसानंतर हुमणी किडीचे भुंगेरे सुप्तावस्थेतून बाहेर येतात. खाद्य व मीलनासाठी ते बाभूळ, कडुनिंब यांसारख्या झाडांवर मोठ्या प्रमाणात जमा होतात. या काळात भुंगेरे गोळा करून नष्ट केल्यास पुढील हंगामातील प्रादुर्भावावर प्रभावी नियंत्रण मिळवता येते.

हुमणीच्या भुंगेरांना आकर्षित करण्यासाठी प्रकाश सापळे हा सर्वांत स्वस्त व प्रभावी उपाय मानला जातो. यासाठी मोठे प्लास्टिकचे घमेले, १०० ते २०० वॅटचा बल्ब तसेच पाण्यात मिसळण्यासाठी डिझेल किंवा रॉकेलचा वापर केला जातो. शेताच्या बांधावर किंवा कडुनिंब अथवा बाभळीच्या झाडाखाली पाच ते सहा फूट उंचीवर बल्ब बसवून त्याखाली पाणी व रॉकेल मिश्रित घमेले ठेवले जाते. प्रकाशामुळे आकर्षित झालेले भुंगेरे पाण्यात पडून नष्ट होतात.

एक हेक्टर क्षेत्रासाठी एक ते दोन प्रकाश सापळे पुरेसे ठरतात. एका सापळ्यात दररोज शेकडो भुंगेरे अडकू शकतात. त्यात नर आणि मादी भुंगेरे नष्ट झाल्याने त्यांच्या प्रजनन प्रक्रियेला आळा बसतो. एक मादी भुंगेरा ५० ते ६० अंडी घालत असल्याने भविष्यात निर्माण होणाऱ्या अळ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकते.

एका गावातील किमान दहा शेतकऱ्यांनी जरी प्रकाश सापळे उभारले, तरी हुमणी अळीचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात रोखणे शक्य असल्याचे कृषी तज्ज्ञांचे मत आहे. यंदा एल निनोच्या प्रभावामुळे कमी पाऊस आणि पावसातील खंड पडण्याची शक्यता असल्याने हुमणी अळीच्या प्रादुर्भावाचा धोका वाढू शकतो. हुमणीचे भुंगेरे साधारणपणे २० ते २५ जूनपर्यंतच आढळतात. त्यामुळे या कालावधीत शेतकऱ्यांनी सावध राहून सामुदायिक पातळीवर उपाययोजना करणे गरजेचे आहे.

प्रकाश सापळ्यांच्या वापरामुळे रासायनिक कीटकनाशकांवरील अवलंबित्व कमी होते. पर्यावरणपूरक पद्धतीने हानिकारक किडींचे नियंत्रण करता येते तसेच सापळ्यात अडकणाऱ्या भुंगेरांच्या संख्येवरून संभाव्य प्रादुर्भावाचाही अंदाज घेता येतो. त्यामुळे प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्यास पुढील हंगामातील नुकसान आणि नियंत्रणावरील खर्च दोन्ही कमी होण्यास मदत होणार आहे.

## राजगुरुनगर सहकारी बँकेला दुहेरी पुरस्कार

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**राजगुरुनगर** : महाराष्ट्र राज्य कार्यक्षेत्र असलेल्या राजगुरुनगर सहकारी बँक लिमिटेडने उत्कृष्ट आर्थिक कामगिरीच्या बळावर राष्ट्रीय स्तरावरील दोन प्रतिष्ठेचे पुरस्कार पटकावले आहेत. भारत नेटवर्क ग्रुप, एनएएफसीयूबी आणि पुणे नागरी सहकारी बँक्स असोसिएशन लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित भारत को-ऑपरेटिव्ह बँकिंग समिट, प्रशिक्षण व पुरस्कार परिषद २०२६ मध्ये बँकेला बेस्ट अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक आणि बेस्ट एनपीए मॅनेजमेंट या पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले.

लखनौ येथे शनिवारी झालेल्या भव्य सोहळ्यात आसाम स्टेट ॲपेक्स को-ऑपरेटिव्ह बँकेचे अध्यक्ष तथा आमदार विश्वजीत फुकण, भारत नेटवर्क ग्रुपचे संस्थापक व संचालक डॉ. अनुपम गुप्ता आणि डॉ. आशिष श्रीवास्तव यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. याबाबतची माहिती बँकेचे अध्यक्ष सागर पाटोळे यांनी दिली. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात बँकेने ठेवी आणि कर्जवाटपात उल्लेखनीय वाढ नोंदविली आहे. तसेच स्थूल नफ्यात झालेली वाढ, थकीत कर्ज वसुलीतील यश, ग्रॉस एनपीएचे नियंत्रित प्रमाण आणि नेट एनपीए शून्य टक्क्यांवर राखण्यात मिळवलेले यश या महत्त्वाच्या निकषांच्या आधारे बँकेची या पुरस्कारांसाठी निवड करण्यात आली.

या सन्मानामुळे बँकेच्या कार्यक्षम व्यवस्थापनाला आणि ग्राहकाभिमुख धोरणांना राष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाल्याची भावना बँकेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली. पुरस्कार स्वीकारताना अध्यक्ष सागर पाटोळे, उपाध्यक्ष रामदास धनवटे, व्यवस्थापन मंडळ अध्यक्ष तथा संचालक किरण आहेर, संचालक विजया शिंदे, राजेंद्र वाळुंज, राहुल तांबे, अरुण थिगळे, विनायक घुमटकर, अविनाश कहाणे, समीर आहेर, विजय डोळस, तज्ज्ञ संचालक ॲड. धर्मेंद्र खांडरे, गौतम कोतवाल तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी शांताराम वाक्चौरे उपस्थित होते.

## माऊली पालखी सोहळ्यासाठी रानवडे घराण्याच्या बैलजोडीचा मान

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**आळंदी** : आषाढी वारीनिमित्त होणाऱ्या श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यात श्रींचा रथ ओढण्याचा मान यंदा स्थानिक रानवडे घराण्यातील हर्षवर्धन प्रदीप रानवडे आणि तुळशीराम ज्ञानोबा रानवडे यांच्या बैलजोडीस मिळाला आहे. बैलजोड निवड समितीने याबाबतचा निर्णय पत्राद्वारे श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीला कळविला आहे.

बैलजोड निवड समितीचे अध्यक्ष बबनराव कुऱ्हाडे पाटील यांनी पालखी सोहळा प्रमुख ॲड. राजेंद्र उमाप आणि संस्थान कमिटीचे प्रमुख विश्वस्त डॉ. भावार्थ देखणे यांना समितीचा निर्णय पत्राद्वारे सादर केला. त्यानुसार मानकरी बैलजोडीची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. यंदा रोटेशन पद्धतीनुसार रानवडे घराण्याकडे बैलजोडीचा मान येत असल्याने प्राप्त अर्जांमधून हर्षवर्धन रानवडे आणि तुळशीराम रानवडे यांच्या बैलजोडीची निवड करण्यात आली. या निवडीची माहिती संस्थान कमिटीला देण्यात आली असून संबंधित मानकऱ्यांनाही निवडीचे पत्र सुपूर्द करण्यात आले आहे. पालखी सोहळ्यात आळंदी ते फलटण आणि परतीच्या प्रवासात फलटण ते आळंदी या टप्प्यात हर्षवर्धन रानवडे यांची बैलजोडी सेवा देणार आहे. तर फलटण ते पंढरपूर आणि पंढरपूर ते फलटण या टप्प्यात तुळशीराम रानवडे यांची बैलजोडी श्रींच्या रथाची सेवा बजावणार आहे.

या निवडीसंदर्भातील पत्र प्रदान करताना समितीचे अध्यक्ष बबनराव कुऱ्हाडे पाटील, विलास घुंडरे पाटील, रामदास भोसले, ज्ञानोबा वहीले, सचिन रानवडे, तुळशीराम रानवडे आणि हर्षवर्धन रानवडे उपस्थित होते. दोन्ही मानकऱ्यांनी समितीचे पत्र स्वीकारून सेवा बजावण्यास संमती दिल्याचे सांगण्यात आले.

## माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मंचर** : रयत शिक्षण संस्थेच्या श्री भैरवनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक तांत्रिक विद्यालय, अवसरी खुर्द येथील एसएससी बॅच १९९२ च्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा एकलहरे येथील सिल्क रूट रिसॉर्टमध्ये उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. तब्बल ३४ वर्षांनंतर मित्र-मैत्रिणी एकत्र आल्याने जुन्या आठवणींना उजाळा मिळाला आणि भावनिक वातावरण निर्माण झाले.

स्नेहमेळाव्यास विद्यालयाचे माजी शिक्षक ज्ञानेश्वर शेटे यांची विशेष उपस्थिती लाभली. अध्यक्षस्थानावरून मार्गदर्शन करताना त्यांनी शालेय जीवनातील संस्कार, शिक्षकांचे योगदान आणि आयुष्यातील मैत्रीचे महत्त्व अधोरेखित केले. यावेळी माजी विद्यार्थ्यांनी शालेय जीवनातील विविध अनुभव, आठवणी आणि प्रसंगांना उजाळा देत शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

कार्यक्रमात विविध मनोरंजनात्मक उपक्रम, संवाद सत्रे आणि मुक्त गप्पांचे आयोजन करण्यात आले. दूरवरून आलेल्या माजी विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या स्नेहमेळाव्याच्या माध्यमातून मैत्रीचे बंध अधिक दृढ करण्याचा संदेश देण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाळासाहेब आरुडे यांनी केले. आयोजन व नियोजन मच्छिंद्र गावडे, मच्छिंद्र भोर, राहुल अभंग, अनिल गावडे तसेच नितीनकुमार नरवडे यांनी केले. या स्नेहमेळाव्यास सुजाता घोलप, मीरा शेटे, सीमा घुले, शिवदास भोर, योगेश कराळे, नितीन खेडकर, सचिन भोर, विकास टेमकर, हेमंत शिंदे, राजेंद्र आरुडे, संतोष भोर यांच्यासह सुमारे ५० माजी विद्यार्थी उपस्थित होते. स्नेह, आनंद आणि जुन्या आठवणींनी भरलेला हा स्नेहमेळावा उपस्थितांसाठी अविस्मरणीय ठरला. भविष्यात अशा प्रकारचे स्नेहसंमेलन नियमितपणे आयोजित करण्याचा संकल्पही यावेळी व्यक्त करण्यात आला.

### दिलीप वळसे पाटील यांचा विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांशी संवाद

# करिअरची दिशा ठरविताना तज्ज्ञांचे मार्गदर्शन महत्त्वाचे

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मंचर** : डी.जी. फाउंडेशन, एनसीआरडी आणि आंबेगाव तालुका मुख्याध्यापक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करिअर मार्गदर्शन मेळावा व गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभात माजी सहकारमंत्री तथा आमदार दिलीप वळसे पाटील यांनी विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांशी संवाद साधला. दहावी व बारावीनंतरचा कालावधी विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाचा असून करिअरची दिशा निश्चित करताना तज्ज्ञांचे मार्गदर्शन आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

दहावी आणि बारावीनंतर पुढील शिक्षण व करिअरची निवड करताना विद्यार्थी आणि पालकांच्या मनात अनेक प्रश्न निर्माण होतात. अशा वेळी अनुभवी मार्गदर्शकांचे सल्ले विद्यार्थ्यांना योग्य दिशा देण्यास उपयुक्त ठरतात, असे मत वळसे पाटील यांनी व्यक्त केले. यावेळी ज्येष्ठ करिअर मार्गदर्शन तज्ज्ञ डॉ. विवेक वेलणकर यांनी विद्यार्थी आणि पालकांना विविध करिअर संधी, प्रवेश प्रक्रिया, स्पर्धा परीक्षा, कौशल्य विकास, स्वयंरोजगार आणि उद्योजकतेविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. बदलत्या काळात उपलब्ध होत असलेल्या नव्या संधींची माहिती देताना विद्यार्थ्यांनी आपल्या आवडी, क्षमता आणि कौशल्यांचा योग्य मेळ साधून करिअरची दिशा निवडावी, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय यश मिळविणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. भविष्यातील पिढीला योग्य दिशा देणारा हा उपयुक्त उपक्रम यशस्वीपणे आयोजित केल्याबद्दल वळसे पाटील यांनी डी.जी. फाउंडेशन, एनसीआरडी, आंबेगाव तालुका मुख्याध्यापक संघ आणि सर्व आयोजकांचे अभिनंदन केले तसेच पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमास भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष बाळासाहेब बेंडे, प्रदीप वळसे पाटील, डॉ. विवेक वेलणकर, जिल्हा परिषद उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील, पूर्वा वळसे पाटील, विष्णूकाका हिंगे, सभापती कैलास काळे, निलेश थोरात, वैभव उंडे, सुषमा शिंदे, सचिन पानसरे आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली.

सध्या मोठ्या स्पर्धेचे युग असून कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वाढत्या वापरामुळे करिअर आणि रोजगार क्षेत्रातील आव्हाने अधिक वाढली आहेत. मात्र या बदलांकडे भीतीच्या दृष्टीने न पाहता नव्या संधी म्हणून पाहण्याची गरज आहे. योग्य शिक्षण, कौशल्य विकास, सातत्यपूर्ण मेहनत आणि सकारात्मक दृष्टिकोन यांच्या बळावर विद्यार्थी कोणतेही ध्येय गाठू शकतात, असे प्रतिपादन एनसीआरडीच्या संचालक पूर्वा वळसे पाटील यांनी केले.

## कुमार कदम यांनी स्वीकारला पदभार

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**रांजणगाव गणपती** : रांजणगाव एमआयडीसी (ता. शिरूर) पोलिस ठाण्याच्या पोलिस निरीक्षकपदी कुमार रामचंद्र कदम यांनी नुकताच पदभार स्वीकारला आहे. यापूर्वी येथे कार्यरत असलेले पोलिस निरीक्षक महादेव वाघमोडे यांची आर्थिक गुन्हे शाखेत बदली झाल्यानंतर त्यांच्या जागी कुमार कदम यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

कुमार कदम यांनी २००७ ते २०१२ या कालावधीत नागपूर शहर येथे पोलिस उपनिरीक्षक म्हणून सेवा बजावत आपल्या प्रशासकीय कारकिर्दीची सुरुवात केली. त्यानंतर त्यांनी चाकण, आळंदी (जि. पुणे), कुरुंदवाड (ता. शिरोळ, जि. कोल्हापूर) तसेच मुंबई येथे सहाय्यक पोलिस निरीक्षक म्हणून काम केले आहे.

रांजणगाव एमआयडीसी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील गावांमध्ये तसेच औद्योगिक परिसरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे, महिला आणि महिला कामगारांच्या सुरक्षेला प्राधान्य देणे, वाहतूक कोंडी कमी करून वाहतूक शिस्त राखणे तसेच शाळा, महाविद्यालये आणि एमआयडीसी परिसरातील रोडरोमिओंवर प्रभावी कारवाई करणे या बाबींना विशेष प्राधान्य दिले जाणार असल्याचे कुमार कदम यांनी सांगितले.

## ममता बॅनर्जी यांना राष्ट्रीय उपाध्यक्षपद मिळण्याची शक्यता

# तृणमूलचे काँग्रेसमध्ये विलीनीकरण ?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर तृणमूल काँग्रेसमधील अंतर्गत घडामोडींना वेग आला असून पक्षातील कथित बंडाळी आणि संभाव्य राजकीय फेरबदलांमुळे राष्ट्रीय राजकारणात चर्चांना उधाण आले आहे. याच पार्श्वभूमीवर तृणमूल काँग्रेस आणि काँग्रेस यांच्यात संभाव्य विलीनीकरणाबाबत विविध वृत्ते समोर येत आहेत. मात्र, या संदर्भातील कोणतीही अधिकृत घोषणा अद्याप झालेली नाही.



सूत्रांच्या हवाल्याने प्रसारित झालेल्या वृत्तांनुसार, काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांनी तृणमूल काँग्रेसच्या प्रमुख ममता बॅनर्जी यांच्यासमोर पक्ष विलीनीकरणाचा प्रस्ताव ठेवला आहे. या प्रस्तावानुसार ममता बॅनर्जी यांना काँग्रेसमध्ये राष्ट्रीय उपाध्यक्षपद, तर अभिषेक बॅनर्जी यांना सरचिटणीसपदाची जबाबदारी देण्याची चर्चा असल्याचे सांगितले जात आहे. तसेच ममता बॅनर्जी यांना राज्यसभेवर पाठविण्याचाही प्रस्ताव असल्याचे वृत्त आहे.

दरम्यान, दिल्लीत लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि तृणमूल काँग्रेसचे राष्ट्रीय सरचिटणीस अभिषेक बॅनर्जी यांच्यात बैठक झाली. त्यानंतर ममता बॅनर्जी यांनी सोनिया गांधी यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. या भेटींमुळे राजकीय चर्चांना अधिकच उधाण आले.

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीनंतर तृणमूल काँग्रेसमध्ये मोठ्या प्रमाणात असंतोष निर्माण झाल्याची चर्चा आहे. काही आमदार आणि खासदार पक्ष नेतृत्वाविरोधात भूमिका घेत असल्याचे वृत्त असून, काही प्रमुख नेत्यांनी राजीनामेही दिले आहेत. राज्यसभा सदस्य सुष्मिता देव आणि सुखेंदु शेखर रॉय यांच्या राजीनाम्यांमुळे पक्षातील संकट अधिक गडद झाल्याचे मानले जात आहे. मात्र, तृणमूल काँग्रेसने काँग्रेसमध्ये विलीनीकरणाच्या चर्चांना स्पष्टपणे नकार दिला आहे. राहुल गांधी आणि अभिषेक बॅनर्जी यांच्या बैठकीत अशा कोणत्याही विषयावर चर्चा झाली नसल्याचे पक्षाच्या सूत्रांनी स्पष्ट केले आहे. विलीनीकरणाच्या बातम्या केवळ अफवा असल्याचा दावा तृणमूल काँग्रेसकडून करण्यात आला आहे. त्यामुळे तृणमूल काँग्रेस आणि काँग्रेस यांच्यातील संबंध, विरोधी आघाडीतील भविष्यातील राजकीय समीकरणे आणि ममता बॅनर्जी यांची पुढील भूमिका याबाबत उत्सुकता वाढली असली तरी अधिकृत भूमिका समोर येईपर्यंत या सर्व घडामोडींकडे राजकीय तर्कवितर्क म्हणूनच पाहिले जात आहे.

## राहुल, सोनिया यांची मुख्यमंत्री विजयशी भेट

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** तामिळनाडूचे मुख्यमंत्री आणि तमिळ वेत्री कळगम (टीव्हीके) पक्षाचे प्रमुख सी. जोसेफ विजय यांनी बुधवारी काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्या सोनिया गांधी आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांची भेट घेतली. मुख्यमंत्रीपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर विजय यांची सोनिया गांधी यांच्याशी झालेली ही पहिलीच भेट असल्याने राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आले आहे.

दिल्लीतील या भेटीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. देशातील विरोधी पक्षांची आघाडी अधिक मजबूत करण्यासाठी काँग्रेस प्रयत्नशील असताना तामिळनाडूतील नव्या राजकीय समीकरणांच्या पार्श्वभूमीवर ही भेट झाली. विजय यांच्या नेतृत्वाखालील टीव्हीकेने नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत ऐतिहासिक यश मिळवत प्रथमच सत्तेवर झेप घेतली आहे. मुख्यमंत्री झाल्यानंतर विजय यांनी यापूर्वी पंतप्रधानांची भेट घेतली होती. त्यावेळी राहुल गांधी आणि सोनिया गांधी यांचीही भेट होण्याची शक्यता वर्तवली जात होती. मात्र ती भेट होऊ शकली नव्हती. त्यानंतर काँग्रेस आणि टीव्हीके यांच्यातील राजकीय संवाद अधिक वाढल्याचे दिसून आले असून त्याचाच भाग म्हणून ही भेट झाल्याचे मानले जात आहे. यामुळे काँग्रेस आणि टीव्हीके यांच्यातील संबंध अधिक दृढ होण्याची शक्यता आहे. तामिळनाडूमध्ये काँग्रेसला सत्तेत सहभागी करून घेण्याचा निर्णय विजय यांनी यापूर्वीच घेतला होता. त्यांच्या मंत्रिमंडळात काँग्रेसच्या दोन आमदारांना स्थान देण्यात आले आहे. तसेच राज्यसभेची एक जागाही काँग्रेसला देण्यात आल्याने दोन्ही पक्षांमधील सहकार्य अधिक बळकट झाल्याचे मानले जाते.

दरम्यान, तामिळनाडूच्या राजकारणात काँग्रेसचा सहयोगी पक्ष राहिलेल्या द्रविड मुन्नेत्र कळघम (द्रमुक) आणि काँग्रेस यांच्यातील संबंधांमध्ये अलीकडे काहीसा तणाव निर्माण झाल्याची चर्चा आहे. अशा परिस्थितीत काँग्रेस टीव्हीकेकडे संभाव्य दीर्घकालीन मित्रपक्ष म्हणून पाहत असल्याचे राजकीय निरीक्षकांचे मत आहे.

## सारांश वृत्त

### मिझोरममध्ये अंमली पदार्थ जप्त

**आयझॉल :** मिझोरम पोलिसांनी अंमली पदार्थविरोधी दोन स्वतंत्र कारवायांमध्ये २.३४ कोटी रुपये किमतीचे अफूचे द्रव आणि हेरॉईन जप्त केले. सैतुअल आणि चंफाई जिल्ह्यांत ही कारवाई करण्यात आली. मणिपूरहून आयझॉलकडे जाणारी एक कार केइफांग परिसरात अडवून तिची तपासणी करण्यात आली असता वाहनात लपवून ठेवलेली संशयित अफूच्या द्रवाची ७१ पाकिटे आढळून आली. दुसऱ्या कारवाईत हेरॉईनही जप्त करण्यात आले.

### परिमल नथवानी यांचा अर्ज वैध

**रांची :** झारखंडमधील राज्यसभा निवडणुकीत भाजप समर्थित अपक्ष उमेदवार परिमल नथवानी यांच्या उमेदवारीवरून राजकीय वाद निर्माण झाला आहे. काँग्रेसने त्यांच्या उमेदवारी अर्जातील प्रतिज्ञापत्रात खोटी व अपूर्ण माहिती दिल्याचा आरोप करत अर्ज फेटाळण्याची मागणी केली होती. मात्र, छाननीनंतर निवडणूक अधिकाऱ्यांनी नथवानी यांचा उमेदवारी अर्ज वैध असल्याचे घोषित केले. उद्योगपती आणि आंध्र प्रदेशमधून राज्यसभेवर निवडून आलेले नथवानी यांच्या उमेदवारीमुळे झारखंडमधील राज्यसभा निवडणुकीचे वातावरण तापले आहे.

### राजधानी दिल्लीत इलेक्ट्रिक दुचाकींची विक्रमी नोंदणी

**नवी दिल्ली :** दिल्लीत यंदाच्या जानेवारी ते मे कालावधीत इलेक्ट्रिक दुचाकी आणि खासगी इलेक्ट्रिक कारच्या नोंदणीत २०१९ नंतरची सर्वोच्च वाढ नोंदविण्यात आली आहे. संशोधन संस्था एन्व्हायरोकॅटॅलिस्टच्या आकडेवारीनुसार, या कालावधीत इलेक्ट्रिक दुचाकींचा ईव्ही बाजारातील वाटा ५१.९ टक्के राहिला असून हे क्षेत्र आघाडीवर आहे. खासगी इलेक्ट्रिक चारचाकी वाहनांचा वाटा २४.३ टक्के, तर इलेक्ट्रिक तीनचाकी वाहनांचा वाटा १२.३ टक्के आहे. दुसरीकडे, ई-रिक्षांच्या नोंदणीत मोठी घट झाली असून गेल्या सात वर्षांतील ही सर्वात नीचांकी पातळी ठरली आहे.

## तृणमूल काँग्रेसला आणखी एक धक्का

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** तृणमूल काँग्रेसला आणखी एक मोठा राजकीय धक्का बसला असून पक्षाच्या राज्यसभा सदस्य सुष्मिता देव यांनी राज्यसभा सदस्यत्वासह पक्षाचाही राजीनामा दिला आहे. गेल्या आठवड्यात ज्येष्ठ नेते सुखेंदु शेखर रॉय यांनी पक्ष आणि राज्यसभेचा राजीनामा दिल्यानंतर अवघ्या काही दिवसांत झालेली ही दुसरी मोठी गळती मानली जात आहे. राजीनाम्यानंतर सुष्मिता देव यांनी आपण एकाच वेळी दोन भूमिकांमध्ये राहू इच्छित नसल्याचे सांगितले. पक्ष सोडण्याचा निर्णय घेतल्यानंतर राज्यसभा सदस्यपदावर राहणे योग्य ठरणार नाही, असे मत त्यांनी व्यक्त केले. मात्र, पक्ष सोडण्यामागील सविस्तर कारणांबाबत त्यांनी भाष्य करण्यास नकार दिला.

सुष्मिता देव या मूळच्या आसाममधील काँग्रेसच्या नेत्या असून २०१४ मध्ये त्या सिलचर लोकसभा मतदारसंघातून खासदार म्हणून निवडून आल्या होत्या. काँग्रेसमधील प्रदीर्घ कारकीर्दीनंतर त्यांनी २०२१ मध्ये तृणमूल काँग्रेसमध्ये प्रवेश केला. त्यानंतर पक्षाच्या राष्ट्रीय प्रवक्त्या म्हणून त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आणि पुढे त्यांना राज्यसभेवर पाठविण्यात आले होते. राजीनाम्यानंतर त्यांनी आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांची भेट घेतल्याने त्यांच्या पुढील राजकीय वाटचालीबाबत तर्कवितर्कांना उधाण आले आहे. काही वृत्तांनुसार त्या भारतीय जनता पक्षात प्रवेश करू शकतात, अशी चर्चा सुरू आहे. मात्र, याबाबत अद्याप अधिकृत घोषणा झालेली नाही.

राज्यसभा सभापती सी. पी. राधाकृष्णन यांनी सुष्मिता देव यांचा राजीनामा स्वीकारला आहे. तृणमूल काँग्रेसच्या संसदीय गटाला धक्का बसला आहे. बंगालमधील राजकीय घडामोडी आणि पक्षांतर्गत मतभेदांच्या पार्श्वभूमीवर टीएमसीमध्ये अस्वस्थता वाढल्याचे चित्र दिसत आहे.

## पीओकेत पाक लष्कराचे हेलिकॉप्टर कोसळले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**इस्लामाबाद :** पाकिस्तानी लष्कराचे एमआय-१७ हेलिकॉप्टर बुधवारी पाकव्याप्त काश्मीरमध्ये तांत्रिक बिघाडामुळे कोसळल्याची घटना घडली. प्रादेशिक राजधानी मुझफ्फराबादजवळ झालेल्या या दुर्घटनेनंतर बचाव पथकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. हेलिकॉप्टरमध्ये किती जण प्रवास करत होते आणि दुर्घटनेत किती जण जखमी किंवा मृत्युमुखी पडले, याबाबतची अधिकृत माहिती मात्र तत्काळ जाहीर करण्यात आलेली नाही.

ही दुर्घटना संयुक्त अवामी कृती समितीने पुकारलेल्या निषेध आंदोलन आणि संपाच्या पार्श्वभूमीवर घडली. विविध संघटनांचा समावेश असलेल्या या समितीवर नुकतीच बंदी घालण्यात आली होती. तथापि, लष्कराने या आंदोलनाचा आणि हेलिकॉप्टर दुर्घटनेचा कोणताही संबंध असल्याचे संकेत दिलेले नाहीत.

प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, हेलिकॉप्टरने हेलिपॅडवरून उड्डाण केल्यानंतर काही मिनिटांतच त्यामध्ये तांत्रिक अडचण निर्माण झाली. त्यानंतर नियंत्रण सुटल्याने हेलिकॉप्टर जमिनीवर कोसळले. अपघातानंतर परिसरात एकच खळबळ उडाली. स्थानिक प्रशासन, लष्करी अधिकारी आणि बचाव पथके तातडीने घटनास्थळी दाखल झाली. जखमींना त्वरित उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. दुर्घटनेनंतर लष्कराने परिसर ताब्यात घेतला असून घटनास्थळाची पाहणी सुरू आहे. अपघाताचे कारण निश्चित करण्यासाठी विशेष चौकशी मंडळाची नियुक्ती करण्यात आल्याची माहिती पाकिस्तानी लष्कराने दिली आहे. लष्कराच्या निवेदनात बचाव आणि पुनर्प्राप्ती पथके तत्काळ घटनास्थळी पोहोचल्याचे नमूद करण्यात आले आहे. तांत्रिक बिघाडामुळे हा अपघात झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला असला, तरी चौकशी पूर्ण झाल्यानंतरच नेमके कारण स्पष्ट होणार आहे.

पाकिस्तानचे राष्ट्रपती आसिफ अली झरदारी आणि पंतप्रधान शहबाज शरीफ यांनी दुर्घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले आहे.

पाकिस्तानचे लष्करप्रमुख फील्ड मार्शल असीम मुनीर यांनीही या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला. त्यांनी मृतांच्या कुटुंबीयांप्रती सहवेदना व्यक्त करत बचाव आणि मदत कार्यात सहभागी असलेल्या पथकांचे कौतुक केले.

पाक लष्कराच्या हेलिकॉप्टर दुर्घटनांच्या मालिकेतील ही आणखी एक घटना मानली जात आहे.

## उत्तर प्रदेशात पंचायतसाठी अंतिम मतदार यादी जाहीर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लखनौ :** उत्तर प्रदेश राज्य निवडणूक आयोगाने पंचायत निवडणुकांसाठी अंतिम मतदार यादी जाहीर केली असून यामध्ये सुमारे २९ लाख नव्या मतदारांचा समावेश करण्यात आला आहे. विशेष पुनरावलोकन मोहिमेनंतर तयार करण्यात आलेल्या या यादीमुळे राज्यातील ग्रामपंचायत, क्षेत्र पंचायत आणि जिल्हा परिषद निवडणुकांच्या तयारीला वेग आला आहे.

राज्य निवडणूक आयोगाने मतदार याद्यांचे अद्ययावतीकरण करण्यासाठी व्यापक मोहीम राबविली होती. या प्रक्रियेदरम्यान नव्याने पात्र ठरलेल्या मतदारांची नोंदणी करण्यात आली, तर मृत, स्थलांतरित किंवा दुबार नोंद असलेल्या मतदारांची नावे वगळण्यात आली. यामुळे मतदार यादी अधिक अचूक आणि पारदर्शक बनल्याचा दावा प्रशासनाने केला आहे. अंतिम यादीत समाविष्ट करण्यात आलेल्या सुमारे २९ लाख नव्या मतदारांमध्ये मोठ्या प्रमाणावर युवकांचा सहभाग आहे. वयाची १८ वर्षे पूर्ण केलेल्या नवमतदारांनी यावेळी प्रथमच पंचायत निवडणुकीत मतदानाचा अधिकार प्राप्त केला आहे. मतदार याद्यांच्या शुद्धीकरण मोहिमेत मोठ्या प्रमाणावर अपात्र नावेही वगळण्यात आली आहेत. मृत्यू, स्थलांतर, दुहेरी नोंदणी किंवा इतर तांत्रिक कारणांमुळे अनेक नावे यादीतून कमी करण्यात आली आहेत. त्यामुळे मतदार यादी अधिक विश्वासार्ह झाल्याचा दावा निवडणूक अधिकाऱ्यांनी केला आहे.

आयोगाने जिल्हानिहाय अंतिम मतदार याद्या संबंधित जिल्हाधिकारी आणि पंचायत निवडणूक कार्यालयांमार्फत उपलब्ध करून दिल्या आहेत. मतदारांना आपले नाव आणि तपशील ऑनलाइन तसेच स्थानिक स्तरावर तपासण्याची सुविधाही दिली आहे.

## केरळ सरकारला देखरेखीचे निर्देश

# हत्तीच्या व्यावसायिक वापरावर नाराजी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** केरळमधील सर्वात उंच हत्ती म्हणून ओळखल्या जाणाऱ्या 'रमन' या हत्तीच्या व्यावसायिक वापराबाबत सर्वोच्च न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. हत्तीचा व्यावसायिक किंवा धार्मिक कार्यक्रमांसाठी वापर न करण्याचे स्पष्ट आदेश यापूर्वीच देण्यात आले असतानाही त्याचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आल्याने न्यायालयाने संबंधितांना फटकारले. तसेच मूक प्राण्यांच्या कल्याणाचा प्रश्न असेल तर न्यायालय मूक प्रेक्षक राहू शकत नाही, अशी स्पष्ट टिप्पणीही खंडपीठाने केली.

न्यायमूर्ती दीपांकर दत्ता आणि न्यायमूर्ती सतीश चंद्र शर्मा यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. जयकृष्णन मेनन यांनी दाखल केलेल्या अवमानना याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने हत्तीच्या देखभालीसंदर्भातील विविध बाबींचा आढावा घेतला. याचिकाकर्त्यांच्या म्हणण्यानुसार, रमन हा हत्ती माता अमृतानंदमयी मठाचा असून त्याला केवळ देखभाल आणि संरक्षणासाठी कृष्णनकुट्टी



यांच्याकडे तात्पुरत्या स्वरूपात देण्यात आले होते. मात्र, कृष्णनकुट्टी यांनी गिफ्ट डीडच्या आधारे हत्तीचे मालकी हक्क आपल्याकडे कायदेशीररीत्या हस्तांतरित झाल्याचा दावा केला. गेल्या १० ते १२ वर्षांपासून आपणच हत्तीची देखभाल करत असल्याचेही त्यांनी न्यायालयात सांगितले.

सुनावणीदरम्यान न्यायालयाने नमूद केले की, रमनसारख्या हत्तीचा व्यावसायिक वापर होत असल्याची बाब अत्यंत गंभीर आहे. न्यायालयाने यापूर्वीच हत्तीचा व्यावसायिक, धार्मिक किंवा मंदिराशी संबंधित कार्यक्रमांसाठी वापर न करण्याचे निर्देश दिले होते. मात्र, तरीही हत्तीला मंदिरातील मिरवणुका, धार्मिक विधी आणि इतर कार्यक्रमांमध्ये सहभागी करण्यात आल्याचे समोर आले.

खंडपीठाने म्हटले की, न्यायालयासमोर दिलेल्या हमीपत्रात हत्तीचा कोणत्याही व्यावसायिक अथवा मंदिराशी संबंधित उपक्रमांसाठी वापर केला जाणार नाही, असे स्पष्ट नमूद करण्यात आले होते. त्यानंतरही आदेशांचे उल्लंघन झाल्यामुळे कृष्णनकुट्टी हे न्यायालयाच्या अवमानाचे दोषी ठरतात. न्यायालयाने कृष्णनकुट्टी यांच्यावर दोन हजार रुपयांचा दंडही ठोठावला. रमनला विविध धार्मिक कार्यक्रमांमध्ये सहभागी करून न्यायालयासमोर दिलेल्या आश्वासनाचा भंग करण्यात आल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.

सुनावणीदरम्यान न्यायमूर्ती सतीश चंद्र शर्मा यांनी मूक प्राण्यांच्या संरक्षणाबाबत महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवले. मूक प्राण्यांच्या कल्याणाशी संबंधित प्रकरणांमध्ये न्यायालय मूक प्रेक्षक राहू शकत नाही. अशा प्राण्यांचे हित आणि संरक्षण सर्वोच्च प्राधान्याचे आहे, असे त्यांनी नमूद केले. हत्तीच्या कल्याणासाठी सर्वोच्च न्यायालयाने केरळ सरकारला काही काळासाठी रमनला आपल्या देखरेखीखाली घेण्याचे निर्देश दिले आहेत. आवश्यक प्रशासकीय आदेश जारी करून राज्य सरकारने हत्तीच्या संरक्षणाची जबाबदारी स्वीकारावी, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

## मीनाक्षी नटराजन प्रकरणी काँग्रेस आक्रमक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** मध्य प्रदेशातील राज्यसभा निवडणुकीसाठी काँग्रेसच्या उमेदवार मीनाक्षी नटराजन यांचा उमेदवारी अर्ज फेटाळण्यात आल्याने राजकीय वाद निर्माण झाला आहे. हा निर्णय चुकीचा आणि कायद्याच्या विरोधात असल्याचा दावा करत काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांच्या शिष्टमंडळाने बुधवारी केंद्रीय निवडणूक आयोगाची भेट घेत निर्णय मागे घेण्याची मागणी केली.

काँग्रेसचे सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल, रणदीपसिंह सुरजेवाला, जयराम रमेश, दीपा दासमुन्शी, विवेक तन्खा आणि अभिषेक मनु सिंघवी यांचा शिष्टमंडळ आयोगाला भेटले. नटराजन यांच्या विरोधात कोणताही फौजदारी खटला प्रलंबित नसताना त्यांचा उमेदवारी अर्ज फेटाळण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला. काँग्रेसच्या कायदेविषयक विभागाचे प्रमुख अभिषेक मनु सिंघवी यांनी या निर्णयावर तीव्र नाराजी व्यक्त केली. त्यांनी सांगितले की, नटराजन यांच्या विरोधात केवळ खासगी तक्रार दाखल करण्यात आली आहे. मात्र, संबंधित न्यायालयाने अद्याप त्या तक्रारीची दखल घेतलेली नाही. त्यामुळे कायद्याच्या दृष्टीने त्यांच्याविरोधात कोणताही गुन्हेगारी खटला अस्तित्वात नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सिंघवी म्हणाले की, एखाद्या व्यक्तीविरोधात खासगी तक्रार दाखल झाली म्हणून ती व्यक्ती आरोपी ठरत नाही. संबंधित न्यायालयाने तक्रारीची दखल घेतल्यानंतरच फौजदारी खटल्याची प्रक्रिया सुरू होते. नटराजन यांच्या प्रकरणात न्यायालयाने अद्याप दखल घेतलेली नसल्याने त्यांना कोणत्याही प्रलंबित खटल्याचा खुलासा करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

रिटर्निंग ऑफिसरचा निर्णय वस्तुनिष्ठ, स्वतंत्र आणि निष्पक्ष वाटत नसल्याचा आरोपही काँग्रेसने केला आहे. अशा परिस्थितीत उमेदवारी अर्ज फेटाळण्याचा निर्णय हा लोकशाही प्रक्रियेच्या मूलभूत तत्त्वांच्या विरोधात असल्याचे पक्षाने म्हटले आहे. काँग्रेसने निवडणूक आयोगाला या प्रकरणात हस्तक्षेप करण्याचे आवाहन केले आहे. आयोगाने आपल्या प्रशासकीय आणि घटनात्मक अधिकारांचा वापर करून हा निर्णय बदलावा, अशी मागणी करण्यात आली.

## अमरनाथ यात्रेच्या सुरक्षेचा आढावा

**श्रीनगर :** अमरनाथ यात्रेच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय राखीव पोलिस दलाचे महासंचालक जी. पी. सिंह यांनी सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेतला. काश्मीरच्या दौऱ्यावर असलेल्या सिंह यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत सीआरपीएफ, जम्मू-काश्मीर पोलीस, नागरी प्रशासन आणि यात्रेच्या सुरक्षेशी संबंधित विविध यंत्रणांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. सुरक्षित आणि सुरळीत यात्रा सुनिश्चित करण्यासाठी सर्व यंत्रणांमध्ये समन्वय राखण्यावर त्यांनी भर दिला.

## १५ वर्षांनंतर वैमानिकाला दिलासा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** तब्बल १५ वर्षांच्या कायदेशीर लढाईनंतर एअर इंडियाच्या एका वैमानिकाला मोठा दिलासा मिळाला आहे. मुंबई उच्च न्यायालयाने नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाच्या (डीजीसीए) २०११ मधील परवाना निलंबनाचा आदेश बेकायदेशीर आणि अस्थिर ठरवत तो रद्द केला आहे. नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांचे उल्लंघन करून हा निर्णय घेण्यात आल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.

जितेंद्र वर्मा या वैमानिकाविरुद्ध १२ मार्च २०११ रोजी घडलेल्या एका घटनेनंतर डीजीसीएने कारवाई केली होती. त्यानंतर त्यांचा वैमानिक परवाना निलंबित करण्यात आला होता. या निर्णयामुळे त्यांची कारकीर्द जवळपास संपुष्टात आली होती. मात्र, त्यांना योग्य सुनावणीची संधी न देता हा निर्णय घेण्यात आल्याचा दावा करत त्यांनी न्यायालयात धाव घेतली होती.

मुंबई उच्च न्यायालयाने सुनावणीदरम्यान डीजीसीएच्या निर्णय प्रक्रियेची छाननी केली. न्यायालयाने नमूद केले की, कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कठोर प्रशासकीय कारवाई करण्यापूर्वी त्याला आपली बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक असते. मात्र, या प्रकरणात त्या मूलभूत तत्त्वांचे पालन झाले नसल्याचे आढळून आले. त्यामुळे परवाना निलंबित करण्याचा आदेश कायदेशीरदृष्ट्या टिकू शकत नसल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. २०११ मध्ये वर्मा यांना उड्डाण सेवेतून दूर करण्यात आले होते. त्यानंतर त्यांनी न्यायालयीन पातळ्यांवर न्यायासाठी प्रयत्न सुरू ठेवले होते.

## सर्वोच्च न्यायालयाने पोक्सो प्रकरणातील शिक्षा केली रद्द

# पीडितेशी विवाह आणि १० लाखांची नुकसानभरपाई

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण कायदा (पोक्सो) अंतर्गत दोषी ठरलेल्या एका आरोपीची शिक्षा सर्वोच्च न्यायालयाने रद्द केल्याने देशभरात कायदेशीर आणि सामाजिक स्तरावर चर्चेला उधाण आले आहे. पीडिता सज्ञान झाल्यानंतर आरोपीशी विवाहबद्ध झाली, दोघे एकत्र राहत असल्याचे न्यायालयासमोर स्पष्ट झाले आणि आरोपीने पीडितेला १० लाख रुपयांची नुकसानभरपाई दिल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १४२ अंतर्गत विशेष अधिकारांचा वापर करून आरोपीची शिक्षा रद्द केली.

न्यायमूर्ती जे. के. माहेश्वरी आणि न्यायमूर्ती अतुल एस. चांदूरकर यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला. न्यायालयाने स्पष्ट केले की, हा निर्णय प्रकरणातील विशिष्ट आणि अपवादात्मक परिस्थिती लक्षात घेऊन देण्यात आला असून तो भविष्यातील अशाच प्रकरणांसाठी आदर्श किंवा पायंडा म्हणून ग्राह्य धरला जाणार नाही.

या प्रकरणाची सुरुवात २०१९ मध्ये झाली होती. कनिष्ठ न्यायालयाने आरोपीला पोक्सो कायद्याच्या कलम ५(एल) आणि ६ अंतर्गत दोषी ठरवत दहा वर्षांच्या कारावासाची शिक्षा सुनावली होती. आरोपीने या



निर्णयाविरोधात मद्रास उच्च न्यायालयात अपील दाखल केले. उच्च न्यायालयाने त्याच्या शिक्षेला स्थगिती दिली; मात्र दोषसिद्धी कायम ठेवली.

दरम्यान, पीडितेने स्वतः पुढाकार घेत आरोपीची शिक्षा रद्द करण्यासाठी न्यायालयात अर्ज केला. तिने प्रतिज्ञापत्राद्वारे आपण आणि आरोपी गेल्या काही वर्षांपासून एकत्र राहत असल्याचे सांगितले. तसेच या प्रकरणावर कायमचा पडदा टाकण्याची इच्छा व्यक्त करत आरोपीची शिक्षा रद्द करण्याची विनंती केली. तथापि, २०२१ मध्ये मद्रास उच्च न्यायालयाने ही मागणी फेटाळून लावली. उच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर आरोपीने सर्वोच्च न्यायालयात अपील केले. सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने पीडितेला फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १६४ अंतर्गत पुन्हा जबाब नोंदवण्याची परवानगी दिली. त्यावेळी काही महत्त्वाच्या बाबी समोर आल्या. पीडितेच्या जबाबानुसार, आरोपीने लग्नाचे आश्वासन देत तिच्याशी शारीरिक संबंध ठेवले होते. नंतर लग्न करण्यास नकार दिल्यामुळे तिने पोलिसांत तक्रार दाखल केली होती. आरोपीच्या कुटुंबीयांनी संपर्क साधून विवाहाचा प्रस्ताव दिला आणि २०२४ मध्ये आरोपी व पीडिता यांचा कायदेशीर विवाह झाला.

सुनावणीदरम्यान पीडितेने न्यायालयाला स्पष्ट सांगितले की, तिला आता खटला पुढे चालवायचा नाही. तिच्या भविष्यातील सुरक्षिततेसाठी १० लाख रुपयांची नुकसानभरपाई मिळाल्यास प्रकरण निकाली निघावे, अशी तिची इच्छा आहे. त्यानंतर आरोपीने ही रक्कम देण्याची तयारी दर्शविली आणि न्यायालयाच्या निर्देशानुसार ती जमा केल्याची माहिती देण्यात आली. राज्य सरकारनेही या प्रकरणातील विशिष्ट परिस्थिती लक्षात घेऊन शिक्षारद्द करण्यास हरकत नसल्याचे सांगितले.

या सर्व घडामोडींचा विचार करून सर्वोच्च न्यायालयाने अनुच्छेद १४२ अंतर्गत विशेष अधिकारांचा वापर केला. संविधानातील हा अनुच्छेद सर्वोच्च न्यायालयाला न्यायाच्या दृष्टीने संपूर्ण आणि अंतिम दिलासा देण्याचा विशेष अधिकार प्रदान करतो.

न्यायालयाने नमूद केले की, पीडिता आता सज्ञान आहे, तिने आरोपीशी विवाह केला आहे, नुकसानभरपाई स्वीकारली आहे आणि खटला पुढे चालविण्याची इच्छा व्यक्त केलेली नाही. त्यामुळे या अपवादात्मक परिस्थितीत दोषसिद्धी आणि शिक्षा कायम ठेवणे योग्य ठरणार नाही.